मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | बुधवार, २३ एप्रिल २०२५ | वर्ष: ६ | अंक:१२५ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


## पाकड्यांना आम्ही सोडणार नाही- शिंदे

**मुंबई, दि. २२ प्रतिनिधी**

मराठी पर्यटक प्रगती जगदाळे हिच्या वडिलांना आणि काकांना धर्म आणि नाव विचारून डोळ्यादेखत गोळ्या घालण्यात आल्या, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. या पाकड्यांना आम्ही सोडणार नाही. हा भारत देश आहे, त्यामुळे त्यांना 'करारा जवाब' मिळेल. भारताचे प्रधानमंत्री आणि गृहमंत्री पाकड्यांना सोडणार नाहीत. ज्या निरपराध लोकांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. "महाराष्ट्रातील पर्यटकांचा या घटनेत समावेश आहे. मी प्रगती जगदाळे या मुलीशी बोललो. तिने सांगितले की तिच्या वडिलांना आणि काकांना नाव विचारून गोळ्या घालण्यात आल्या. अशाप्रकारचा भ्याड हल्ला करण्यात आलाय. ते सर्व पर्यटक घाबरलेल्या अवस्थेत होते. मी त्यांना धीर दिला आणि सांगितले की गृहमंत्री स्वत: तिथे दाखल होत आहेत. मी स्वत: काश्मीरचे नायब राज्यपाल आणि इतर संबंधितांशी बोललो आहे. तिथल्या सर्व लोकांना अपेक्षित मदत मिळेल. लवकरच या पर्यटकांना राज्यात आणण्याची व्यवस्था केली जाईल. एक विशेष अधिकारी नेमला गेलेला आहे, संपर्कासाठी नंबर जारी केला आहे. प्रगती जगदाळे या मुलीशी आम्ही संपर्कात आहोत," असे एकनाथ शिंदे यांनी सांगितला.

# जम्मू काश्मीरमध्ये हिंदू पर्यटकांवर हल्ला

## २७ ठार

## दहशतवाद्यांनी आधी नाव व धर्म विचारला नंतर गोळ्या घातल्या

**अनंतनाग, दि. २२ वृत्तसंस्था**

**जम्मू काश्मीरमधील पहलगाम जिल्ह्यामध्ये पुन्हा एकदा टार्गेट किलिंगची घटना घडली आहे. पहलगाममध्ये आज पोलिसांच्या गणवेशात आलेल्या दोन ते तीन दहशतवाद्यांनी पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार केला. या घटनेत २७ पर्यटक ठार झाले आहे. विशेष म्हणजे, दहशतवाद्यांनी पर्यटकांवर त्यांचे नाव आणि धर्म विचारून गोळ्या झाडल्या. दहशतवादी संघटना टीआरएफने या भ्याड हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे.**



या घटनेनंतर भारतीय लष्करासह केंद्र सरकार ॲक्शन मोडमध्ये आली आहे. लष्कराने परिसराला वेढा घातला असून, दहशतवाद्यांची शोध मोहीम सुरू केली आहे. तसेच, हल्ल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाहा तात्काळ श्रीनगरला रवाना झाले. तत्पुर्वी त्यांनी आयबी आणि रॉ प्रमुखांची बैठक घेऊन योग्य त्या सूचना दिल्या. या हल्ल्याबाबत पंतप्रधान मोदींनीदेखील गृहमंत्री अमित शाहा यांच्याशी फोनवर चर्चा केली असून, कठोर कारवाइचे निर्देश दिले. या हल्ल्याबाबत प्रत्यक्षदर्शिनींनी सांगितले की, दोन ते तीन दहशतवादी पोलिसांच्या गणवेशात आले होते. त्यांनी आधी पर्यटकांना त्यांचे नाव आणि धर्म विचारला, त्यानंतर ठरवून हिंदू धर्मीय पर्यटकांवर गोळीबार सुरू केला. सुरुवातीला या घटनेत २ पर्यटकांचा मृत्यू अन् अनेकजण जखमी झाल्याचे सांगण्यात येत होते. पण, नंतर हा आकडा २७ पर्यंत वाढला. महत्त्वाची बाब म्हणजे बैसरन येथे फक्त पायी जाता येते, हे एक अत्यंत प्रसिद्ध पर्यटन स्थळ असून येथे पर्यटक मोठ्या संख्येने गर्दी करतात. घटनेनंतर लगेचच, पोलिसांचे एक पथक लष्कर आणि निमलष्करी दलांसह घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी पर्यटकांना येथून काढले आणि हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी शोध मोहीम सुरू केली. या वर्षी पर्यटकांवर झालेला हा पहिलाच दहशतवादी हल्ला आहे. गेल्या वर्षी मे महिन्यात अतिरेक्यांनी पर्यटकांवर शेवटचा हल्ला केला होता, ज्यामध्ये दोन पर्यटक जखमी झाले होते. ती घटना देखील पहलगाममध्ये घडली होती.

या हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घटनेचा तीव्र शब्दात निषेध केला आणि दोषींना सोडणार नसल्याचा इशाराही दिला. मोदींसोबतच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, गृहमंत्री अमित शाहा आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यासह अनेक सत्ताधारी आणि विरोधी नेत्यांनी आपापल्या प्रतिक्रिया दिल्या आणि दुःख व्यक्त केले. अशा कठीण काळात सर्व देश एकजूट असल्याचेही विरोधकांनी दाखवून दिले.

### महाराष्ट्रातील २ पर्यटकांचा मृत्यू

मृतांमध्ये महाराष्ट्रातील २ पर्यटकांचा मृत्यू झाल्याचे वृत्त समोर आले आहे. अतुल मोने आणि दिलीप डिसले अशी त्यांची नावे आहेत.

**पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याने लोकांचे हृदय हेलावून गेले आहे. येथे पर्यटकांनी दहशतवाद्यांवर गोळीबार केला ज्यामध्ये २७ पर्यटकाचा मृत्यू झाला आणि सुमारे १२-१३ पर्यटक जखमी झाल्याचे वृत्त आहे. त्याचवेळी, ही घटना पाहणाऱ्या एका महिला पर्यटकाने एक धक्कादायक गोष्ट सांगितली आहे. महिलेने सांगितले आहे की दहशतवाद्यांनी प्रथम लोकांना त्यांचे नाव आणि धर्म विचारला आणि नंतर त्यांना गोळ्या घातल्या.**

## अग्राग्रलेख
## खरीखरी

### हिम्मतबाज निशिकांत

सध्या अनेक बोल घेवड्यांनी सर्व संकेत पायदळी तुडवण्याचे ठरवलेले दिसते. सर्वात वरचे नाव म्हणून झारखंडचे खासदार निशिकांत दुबे यांचा पहिला क्रमांक आहे. निशिकांत दुबे यांचा पहिल्या क्रमांकावर दावा आता मान्य करावाच लागेल. हे निशिकांत दुबे महोदय केवळ संसदेत बोलतात असे नाही. तर त्यांचा संचार 'यत्र तत्र, सर्वत्र' असतो. अशा या महाशयांनी सरळ सरळ सर्वोच्च न्यायालयाच धारेवर धरलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश देशात अशांतता पसरवण्याचे काम करतात. असा अगदी स्पष्ट आणि प्रचंड मोठा आरोप निशिकांत दुबे यांनी केला आहे. संसदेचा एखादा खासदार अशी विधाने करतो. त्याच्याशी आपले काही देणेघेणे नाही असे पक्षाध्यक्ष म्हणतात. अहो तुमचे काही देणे घेणे नसेल. तरी ते खासदार आपल्याच पक्षाचे आहेत. त्यांना अजून तरी पक्षाबाहेर काढलेले नाही किंवा त्यांच्यावर साधी कुठलीच कारवाई केलेली नाही. अशा परिस्थितीत याच निशिकांत दुबे यांनी पुन्हा न्यायालयाला म्हणजेच चक्क सर्वोच्च न्यायालयाला लक्ष्य केलेले आहे. निशिकांत दुबे यांच्यात एवढी हिंमत आली कुठून, हा प्रश्न आता जनता विचारू लागली आहे. कारण त्यांनी पुन्हा न्यायालय लक्ष्य केले आहे. नेहमीच हिंदू-मुस्लिमांची भाषा वापरून या देशाचे भले होणार आहे काय. हे या निशिकांतला विचारणारा पक्षात तरी कोणी आहे की नाही. याचा आता संभ्रम निर्माण झालेला आहे. निशिकांत दुबे यांच्या नंतर त्यांच्याच पक्षातील जे खासदार उपराष्ट्रपती पदावर आरुढ झालेले आहेत. ते धनखड आहेत. ज्यांनी सरळसरळ सर न्यायाधीशांना लक्ष्य करून काही प्रश्न विचारलेले आहेत. ते म्हणतात की, देशात जो कायदा आहे. त्याप्रमाणे संसदच सर्वोच्च आहे. त्याप्रमाणे मान्य करूनही सर्वात महत्त्वाची एक गोष्ट अधोरेखित केली पाहिजे. ती म्हणजे संसदेत जो कायदा पारित केला जातो. तो संविधानाप्रमाणे आहे की नाही हे पडताळून पाहणे सर्वोच्च न्यायालयाचे कामच आहे. हे सुद्धा आताच्या सत्ताधाऱ्यांनीही हे मान्य केले पाहिजे. त्यामुळे जर वक्फचे विधेयक योग्य असेल आणि संविधानाप्रमाणे असेल. तर सर्वोच्च न्यायालय विनाकारण अडथळे आणते, असे म्हणता येईल. पण , याप्रकरणी सध्या तरी सरकारचे सॉलिसिटर जनरल चक्क बॅकफूटवर आहेत. त्यांनी सरन्यायाधीशांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी अवधी हवा होता. तो सर न्यायाधीशांनी दिलेला आहे. आता हे सरन्यायाधीश निवृत्त झाल्यावर ही गोष्ट पटलावर यावी. असा प्रयत्न सुरू असल्याचे म्हणतात. एकूणच निशिकांत दुबे यांच्याप्रमाणे अनेक दुबे सध्याच्या कालावधीत दुबेएवजी चौबे होण्याकरता धडपडत आहेत. दुबे यांची दुबेगिरी त्याच गतीने मागील पानावरून पुढे चालू आहे. हे दुबे महाशय वाचाळ आहेत असे म्हणता येणार नाही. कारण 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे'. असे संत वचन आहे. त्यांनी म्हणजेच दुबे यांनी अजून तरी त्यांच्या वाणी विलासाशिवाय कोणतीही कृती केलेली दिसत नाही. जी गोष्ट उच्चपदस्थ बोलू शकत नाहीत. ते बोलण्याची कामगिरी हे दुबेजी मोठ्या निष्ठेने पार पाडत आहेत. असे राजकीय तज्ञांचे मत आहे. देशातील वातावरण भडकावण्याचे कार्य सर्वोच्च न्यायालय करते की, हे दुबेजी करतात. हा मुद्दा मात्र संशोधनाचाच विषय आहे. एकूणच दुबेजींच्या बहादुरीला नमनच केले पाहिजे. कारण अजून त्यांच्याविरुद्ध कोर्टानेही कारवाई करण्याची हिम्मत दाखवलेली नाही. आता पाच मे ला या प्रकरणाची पुन्हा सुनावणी आहे. या सुनावणीत सरन्यायाधीश काही आदेश पारित करतात की, आपले सरकारचे सॉलिसीटर जनरल पुन्हा नवा मुद्दा उकरून नवीन तारीख मागतात. हेच आपल्याला पाहायचे आहे. तोपर्यंत गप्प राहणेच बरे आहे.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# मत्स्य व्यवसायास कृषी क्षेत्रासारखाच दर्जा



**मुंबई, दि. २२ प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत आज आठ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये, मंत्री नितेश राणेंच्या मत्स्य खात्यासंदर्भात महत्त्वाचा निर्णय झाला असून गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प, ता. पवनी, जि.भंडारा यासाठीही मोठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. गोसी खुर्द प्रकल्पाच्या २५ हजार ९७२ कोटी ६९ लाख रुपयांच्या तरतूदीस सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मत्स्यव्यवसायास चालना देण्यासाठी कृषी क्षेत्रासारखाच दर्जा देण्याचा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात ऐतिहासिक आणि क्रांतिकारी निर्णय घेण्यात आला आहे. मत्स्य व्यवसायला कृषीचा दर्जा दिला आहे, हा गेमचेंजर निर्णय असल्याचे मंत्री नितेश राणे यांनी म्हटले. या निर्णयामुळे मत्स्य व्यवसायमध्ये आपलं राज्य पहिल्या तीन क्रमांकामध्ये येऊ शकते. आपले राज्य सागरी मासेमारी मध्ये ६ व्या क्रमांकवर आहे. ४,६३,००० मच्छिमाराना शेतकऱ्यांप्रमाणे सवलत लाभ मिळणार आहेत. मच्छिमारांना कृषीक्षेत्राप्रमाणे सर्व लाभ मिळणार आहेत. कृषी दरानुसार कर्ज, वीजदरात सवलत, विमा सौर ऊर्जेचाही लाभ मिळेल. तसेच, निधीची उपलब्धता सहज पद्धतीने होणार आहे, असेही नितेश राणेंनी सांगितले. राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत इतर विभागातीलही अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

### मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेले निर्णय

**● ग्रामविकास विभाग**
मौजे नायगाव ता. खंडाळा जि. सातारा येथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक व महिला प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा निर्णय. स्मारकासाठी १४२.६० कोटी तर महिला प्रशिक्षण केंद्रासाठी ६७.१७ लाख रुपयांच्या तरतुदीस मंजूरी.

**● जलसंपदा विभाग**
गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प, ता. पवनी, जि.भंडारा या प्रकल्पाच्या २५ हजार ९७२ कोटी ६९ लाख रुपयांच्या तरतुदीस सुधारित प्रशासकीय मान्यता.

**● कामगार विभाग**
राज्यातील कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करुन महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार करणार.

**● महसूल विभाग**
विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालयात नियुक्त कंत्राटी विधी अधिकारी यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय, ३५ हजार रुपयांएवजी ५० हजार रुपये मानधन मिळणार.

**● विधी व न्याय विभाग**
१४ व्या वित्त आयोगामार्फत राज्यात तात्पुरत्या स्वरुपात स्थापन करण्यात आलेल्या १६ अतिरिक्त न्यायालयांना व २३ जलदगती न्यायालयांना आणखी २ वर्षे मुदतवाढ देण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता.

**● गृहनिर्माण विभाग**
पायाभूत सुविधांच्या अमंलबजावणीत बाधित झोपडपट्टी पुनर्वसनाच्या योजनेतील घरांची निर्मिती व त्यांच्या वितरणासाठीच्या धोरणात सुधारणा.

**● सार्वजनिक बांधकाम विभाग**
पुणे जिल्ह्यातील तळेगाव-चाकण-शिक्रापूर या राष्ट्रीय महामार्गावरील तळेगाव ते चाकण यावर चार पदरी उन्नत मार्ग व जमिनीस समांतर चार पदरी रस्ता तसेच चाकण ते शिक्रापूर यावर जमिनीस समांतर सहा पदरी रस्ता तयार करण्याचा निर्णय.

## यूपीएससी परीक्षेचा निकाल जाहीर

### शक्ती दुबे अव्वल, तर महाराष्ट्रातील अर्चित तिसरा



**नवी दिल्ली, दि. २२ वृत्तसंस्था**

केंद्रीय लोकसेवा आयोगाने नागरी सेवा परीक्षा, २०२४ चा अंतिम निकाल जाहीर केला आहे. सप्टेंबर २०२४ मध्ये लेखी परीक्षा झाली होती. तर, जानेवारी ते एप्रिल २०२५ मुलाखती पार पडल्या होत्या. अखेर या दोन्ही सत्रांचा निकाल जाहीर झाला असून युपीएससी परीक्षेत शक्ती दुबे देशात अव्वल ठरली आहे. त्यानंतर हर्षिता गोयल दुसऱ्या क्रमांकावर आणि अर्चित डोंगरे तिसऱ्या क्रमांकावर आहेत. नागरी सेवा परीक्षा नियम, २०२४ च्या नियम २०(४) आणि (५) नुसार २३० उमेदवारांची एकत्रित राखीव यादी देखील ठेवण्यात आली आहे.

प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोने अधिकृतपणे जाहीर केलेल्या निकालांमध्ये भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय परराष्ट्र सेवा , भारतीय पोलिस सेवा आणि केंद्रीय सेवा, गट 'अ' आणि गट 'ब' मध्ये नियुक्तीसाठी शिफारस केलेल्या १००९ उमेदवारांची यादी समाविष्ट आहे. upsc.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांना निकाल पाहता येणार आहे.

युपीएससीने २०२४ च्या परीक्षेसाठी आयएएस, आयपीएससह एकूण ११३२ पदांसाठी भरती जाहीर केली होती. यामध्ये १००९ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. यापैकी ७२५ पुरुष उमेदवार आणि २८४ महिला उमेदवारांचा समावेश आहे.

## नागपूर खंडपीठ बॉम्बने उडवण्याची धमकी!

### औरंगाबाद खंडपीठालाही धमकीचा ई-मेल

**मुंबई, दि. २२ प्रतिनिधी**

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या ऑफिशियल ई-मेल आयडीवर 'मद्रास टायगर' या नावाने आलेल्या बॉम्बस्फोटाच्या धमकीचा ई-मेल आल्याने एकच खळबळ उडाली आहे. धमकीचा मेल मिळाल्यानंतर तत्काळ सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. बॉम्बशोधक व नाशक पथक तसेच श्वान पथक आणि पोलीस दलाने खंडपीठाच्या इमारतीत व संपूर्ण परिसरात सखोल तपासणी करण्यात आली, मात्र संशयास्पद कोणतीही वस्तू आढळून आली नाही, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

विशेष म्हणजे, 'मद्रास टायगर' या नावाने इतर काही शहरांतील उच्च न्यायालयांच्या इमारतींना देखील स्फोटाने उडवून देण्याची धमकी याआधी मिळाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली जात असून, संपूर्ण तपास सायबर पोलीस विभागाकडे सोपविण्यात आला आहे. धमकीचा मेल नेमका कोणी पाठवला? कुठून पाठवला? हे शोधण्यासाठी नागपूर पोलिसांची सायबर टीम सर्व तांत्रिक बाबींचा तपास करत आहे. दरम्यान, या घटनेमुळे नागपूर खंडपीठ परिसरात काही काळ तणावाचे वातावरण होते. मात्र, पोलिसांनी घेतलेल्या तातडीच्या उपाययोजनांमुळे परिस्थिती नियंत्रणात आणली गेली आहे.

दरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाला देखील बॉम्बस्फोटाची धमकी देणारा एक ई-मेल प्राप्त झाला आहे. हा मेल चेन्नई येथून पाठवण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेची माहिती मिळताच, पोलिसांनी संपूर्ण न्यायालय परिसरात कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे. न्यायालयाच्या सर्व प्रवेशद्वारांवर सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात आली असून, सुरक्षा यंत्रणा सतर्क आहेत. आज दुपारी १२ वाजेच्या सुमारास ई-मेल आला. उच्च न्यायालय प्रशासनाने तत्काळ पोलिसांना याबाबत माहिती दिली, त्यानंतर पोलिसांनी खंडपीठ परिसरात तपास सुरू केला. न्यायालयाच्या संपूर्ण परिसरात बारकाईने तपासणी करण्यात येत आहे. अद्याप कोणतीही संशयास्पद वस्तू आढळलेली नाही. न्यायालयातील सर्व कामकाज नियमित सुरू आहे. नागरिकांना देखील न्यायालयात येण्यास परवानगी देण्यात आली आहे. पोलीस यंत्रणा दक्षतेने काम करत असून, सायबर पोलिसांकडून धमकीच्या ई-मेलचा सखोल तपास सुरू आहे.

## संसदच सर्वोच्च, त्यापेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही : उपराष्ट्रपती

**नवी दिल्ली, दि. २२ वृत्तसंस्था**

संसद लोकशाहीत सर्वोच्च आहे. संसदेपेक्षा कोणताही अधिकार श्रेष्ठ नाही. भारतीय संविधान कसे असेल? त्यात कोणत्या सुधारणा करायच्या हे ठरवण्याचा पूर्ण अधिकार केवळ खासदारांना आहे, असे प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज केले. त्यांनी नुकतीच सर्वोच्च न्यायालयाबाबत केलेल्या विधानावर टीका होत असताना त्यांनी या मुद्यावर पुन्हा एकदा आपले मत व्यक्त केले आहे. ते दिल्ली विद्यापीठामध्ये आयोजित कार्यक्रमात बोलत होते.



"१९७७ मध्ये आणीबाणी लादणाऱ्या पंतप्रधानांना जबाबदार धरण्यात आले. म्हणून, यात शंका नसावी की, संविधान हे लोकांसाठी आहे. ते त्यांचे रक्षण करण्याचे भांडार आहे. निवडून आलेले लोकप्रतिनिधींकडेच संविधानातील मजकूर काय असावा, याचे अंतिम अधिकार आहेत. संसदेच्या वर कोणत्याही अधिकाराची संविधानात कल्पना नाही. संसद सर्वोच्च आहे आणि परिस्थिती असल्याने, मी तुम्हाला सांगतो की, ती देशातील प्रत्येक व्यक्तीइतकीच सर्वोच्च आहे." असेही धनखड यावेळी म्हणाले.

संयावेळी उपराष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाच्या दोन परस्परविरोधी विधानांचा उल्लेख केला. "एका प्रकरणात, सर्वोच्च न्यायालय म्हणते की प्रस्तावना संविधानाचा भाग नाही (गोरकानाथ प्रकरण) आणि दुसऱ्या प्रकरणात ते म्हणते की ते संविधानाचा भाग आहे (केशवानंद भारती).", असे धनखड यांनी सांगितले.

एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयाने अनुच्छेद १४२ अंतर्गत मिळणाऱ्या विशेष अधिकारांचा वापर करत, तमिळनाडूमधील राज्यपालांकडे प्रलंबित असलेली १० विधेयके मंजूर केली होती. तसेच राज्यपालांकडून न राष्ट्रपतींकडे पाठवण्यात आलेल्या विधेयकांवर राष्ट्रपतींनी तीन महिन्यांच्या आत निर्णय घ्यावा, असा निर्देशही दिला होता. या निकालावर सत्तारूढ भाजपमधील अनेक नेत्यांसह उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांना अमान्य केला होता. सर्वोच्च न्यायालय 'सुपर संसद' असल्यासारखे वागत असल्याचे मत धनखड यांनी व्यक्त केले होते.

## हिंदी भाषा सक्तीच्या निर्णयाला स्थगिती

**मुंबई, दि. २२ प्रतिनिधी**

शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. मी स्पष्टपणे नमूद करतो की, हिंदी भाषेच्या संदर्भात केंद्राकडून थोपवलं जाताय हे सांगितलं जाताय असा कुठलाही भाग नाही, असे दादा भुसे यांनी स्पष्ट केले. मी स्पष्टपणे नमूद करतो की, हिंदी भाषेच्या संदर्भात केंद्राकडून थोपवलं जात आहे हे सांगितले जात आहे, असा कुठलाही भाग नाही. नेशनल एड्युकेशन पॉलिसी २०२० मध्ये स्पष्टपणे भाषेच्या संदर्भातला पॅराग्राफ आहे. तीन भाषा शिकवण्यासंदर्भात, तीन भाषेचा हा फॉर्म्युला तिथ दिलेला आहे. केंद्राने कोणतीही भाषा राज्यासाठी बंधनकारक केलेली नाही. २०२० चे शैक्षणिक धोरण आहे. त्यानुसार, ९ सप्टेंबर २०२४ ला तीन भाषेपैकी २ भाषा आपल्या देशाच्या संबंधित असल्या पाहिजे, असे सांगण्यात आले आहे. राज्य सुकणू समितीच्या बैठकीत तिसरी भाषा हिंदी म्हणून स्वीकारण्याचा निर्णय झाल्याचे दादा भुसे यांनी स्पष्ट केले. तसेच, यासंदर्भातील शासन निर्णयात हिंदी भाषा "अनिवार्य" असा उल्लेख झाल्याने संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे, अनिवार्य या शब्दाला स्थगिती देत आहोत आणि पुढील शासन निर्णय यथावकाश निर्गमीत केले जाईल, अशी माहिती देखील दादा भुसे यांनी पत्रकार परिषदेतून दिली.

## सरकारच्या प्रतिनिधींशी बोलणे, यात काहीही चुकीचे नाही- शरद पवार

**बारामती, दि. २२ प्रतिनिधी**

हिंदी सक्तीच्या मुद्द्यावर बोलताना राज ठाकरेंनी उद्धव ठाकरेंसोबत काम करण्याचे संकेत दिले. त्यावर उद्धव ठाकरेंनीही लागलीच टाळी दिली. या संदर्भात पुढे काही राजकीय घडामोडी घडल्या नसल्या तरी राजकीय वर्तुळात चर्चा मात्र जोरात सुरू झाल्या आहेत. ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या मुद्द्यावर जेव्हा शरद पवारांना प्रश्न विचारण्यात आला. तेव्हा त्यांनीही त्यांची भूमिका स्पष्ट केली.



बारामतीमध्ये शरद पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना राज ठाकरे-उद्धव ठाकरे एकत्र येणार असल्याच्या चर्चांबद्दल विचारण्यात आले. त्यांनी याबद्दल भूमिका मांडली. मुंबईच्या निवडणुका जवळ येताना दिसत आहे आणि दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येण्याची चर्चा आहे. याबद्दल शरद पवारांना विचारण्यात आले.

शरद पवार म्हणाले, "हा त्यांचा कौटुंबीक प्रश्न आहे. याची माहिती माझ्याकडे नाही. मी काही त्यांच्याशी बोललो नाही. आणि त्यावर कसं मी भाष्य करू?"

पवार कुटुंबामध्येही एकोपा वाढताना दिसत आहे, याकडेही पवारांचे लक्ष वेधण्यात आले. शरद पवार म्हणाले, "जनतेच्या कामासाठी एकत्र यावं लागतं. आता हा तुम्ही जो प्रश्न करता की उसाच्या संबंधी. उत्पादन वाढीचा. त्यावर आम्ही बसलो होतो. आम्ही काम करून उपयोग नाही. यात सरकार आलं पाहिजे. सरकारच्या प्रतिनिधींशी बोलणं, यात काहीही चुकीचे नाही."

महेश मांजरेकर यांना दिलेल्या मुलाखतीत बोलताना राज ठाकरेंनी उद्धव ठाकरेंसोबत काम करण्यात काही अडचण नसल्याचे म्हटले होते. महाराष्ट्रातील या मुद्द्यांपेक्षा आमच्यातील वाद खूप छोटे आहेत, असेही ते म्हणाले होते. त्यावर उद्धव ठाकरे यांनीही सकारात्मक भूमिका घेतली. त्यामुळे दोन्ही बंधू एकत्र येणार का? या चर्चेला जास्त हवा मिळाली.

## डॉ. घैसास प्रकरण: आयएमए, हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडियाचा राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

**मुंबई, दि. २२ प्रतिनिधी**

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात गर्भवती तनिषा भिसे यांच्या मृत्यूप्रकरणी डॉ. सुश्रुत घैसास यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) आणि हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडिया यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. डॉ. घैसास यांच्यावर पुढील कारवाई झाल्यास राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा या संघटनांनी दिला आहे.





तनिषा भिसे यांच्या मृत्यूसाठी डॉ. घैसास यांच्यावर निष्काळजीपणाचा ठपका ठेवत अलंकार पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम १०६(१) अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. ससून रुग्णालयाच्या अहवालात घैसास यांनी उपचारात हलगर्जीपणा केल्याचे नमूद आहे. मात्र, आयएमएचे इंडियन मेडिकल असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. आर. व्ही. असोकन यांनी हा ठपका अन्यायकारक असल्याचे म्हटले आहे. "रुग्णाला दाखलच केले नसेल तर हलगर्जीपणाचा आरोप कसा? ससूनचा अहवाल एका दिवसात बदलला कसा?" असा सवाल आयएमएने उपस्थित केला.

हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडियानेही डॉ. घैसास यांना पाठिंबा देत सरकारच्या कारवाईला विरोध दर्शविला. "डॉक्टरांवरील अन्यायकारक कारवाईमुळे वैद्यकीय क्षेत्राचे मनोबल खचेल," असे बोर्डाचे म्हणणे आहे. या प्रकरणात पुणे पोलिसांनी डॉ. घैसास यांना नोटीस पाठवून चौकशीसाठी बोलावले आहे.

या घटनेमुळे पुण्यात तणाव वाढला असून, रुग्णालय परिसरात पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. भिसे कुटुंबीयांनी न्यायाची मागणी केली असताना, आयएमए आणि हॉस्पिटल बोर्डाच्या आंदोलनाच्या इशाऱ्याने प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

## कर्कश्श्य हॉर्न नव्हे, सुरेल संगीत!

### वाहनांमध्ये हॉर्नऐवजी भारतीय संगीत वापरले जावे- गडकरी

**नवी दिल्ली, दि. २२ वृत्तसंस्था**

वाहतुकीचा खोळंबा ही पुणे-मुंबईसह कोणत्याही मोठ्या शहरातली तेवढीच मोठी समस्या ठरली आहे. त्यात दिवसेंदिवस वाहनांच्या संख्येत पडणारी भर ही समस्या अधिकच भीषण करत आहे. पण वाहतुकीच्या खोळंब्याबरोबरच वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे ध्वनीप्रदूषणाचीही मोठी समस्या निर्माण झाली आहे. कारण जेवढी जास्त वाहनं, तेवढे कर्कश्श्य हॉर्न आणि तेवढं ध्वनीप्रदूषण! पण आता यावर तोडगा काढण्यासाठी केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरींनी पुढाकार घेतला असून वाहनांमध्ये हॉर्नएवजी भारतीय संगीत वापरलं जावं, यासाठी कायदा करण्याच्या तयारीत केंद्र सरकार आहे!



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सोमवारी एका जाहीर कार्यक्रमात बोलताना वाहनांमधील कर्णकर्कश्श्य हॉर्नचा मुद्दा उपस्थित केला. या हॉर्नच्या आवाजांमुळे रस्त्यांवरील वाहनचालकांना मोठ्या आवाजाचा त्रास तर होतोच, पण त्याचबरोबर आसपासच्या निवासी संकुलांमधील रहिवाश्यांनाही याचा मनस्ताप सहन करावा लागतो. अनेक भागांत घरांमध्ये वृद्ध किंवा रुग्ण राहात असतात. त्यांनादेखील या हॉर्नचा त्रास होतो. त्यामुळेच, त्यावर भारतीय सुमधुर संगीताचा तोडगा नितीन गडकरींनी काढला आहे.

वाहनांमध्ये हॉर्नच्या एवजी बासरी, तबला, व्हायोलिन किंवा हार्मोनियमसारख्या वाद्यांचे आवाज वापरण्यात यावेत, अशा प्रकारचा कायदा संसदेत प्रस्तावित करण्याचा विचार आपण करत असल्याचं नितीन गडकरी म्हणाले.


यावेळी त्यांनी वाहतूक व्यवस्थेच्या माध्यमातून होणाऱ्या वायू प्रदूषणाचाही मुद्दा उपस्थित केला. वाहनांमधून होणाऱ्या वायू उत्सर्जनामुळे देशातील एकूण वायू प्रदूषणापैकी ४० टक्के प्रदूषण होत असल्याचं गडकरी म्हणाले. याचाच सामना करण्यासाठी नरेंद्र मोदी सरकारने मिथेनॉल, इथेनॉलसारख्या हरित व जैव इंधनांचा वापर करण्यास प्रोत्साहन द्यायला सुरुवात केल्याचं गडकरी म्हणाले.

दरम्यान, नितीन गडकरींनी चार वर्षांपूर्वीही वाहनांमधील हॉर्न बदलून तिथे संगीत लावण्याच्या मुद्द्याचा उल्लेख केला होता. २०२१ मध्ये भारतीय वाद्यांचा उपयोग वाहनांमध्ये हॉर्न म्हणून करणे, त्यांची वारंवारिता कमी ठेवणे यासंदर्भात सविस्तर कायदा प्रस्तावित केला जाईल, असं नितीन गडकरी म्हणाले होते. आता पुन्हा एकदा हा मुद्दा उपस्थित करण्यात आला असून त्यावर सोशल मीडियावर नेटिझन्सच्या प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.

## महत्त्वाचे

### पुस्तक दिनाचा चित्रातून जागर


**नाशिक ।** पुस्तक दिनानिमित्त (दि.२३) शाळेतील फळ्यावर विविध रंगीत खडूंच्या




सहाय्याने रेखाटलेली पुस्तकांची आकर्षक चित्रे काढून पुस्तक दिनाचा जागर करण्यात आला. मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक संचलित मोहाडी येथील केआरटी हायस्कूलमधील कृष्णा जाधव व धनंजय जाधव या कला शिक्षकांनी प्राचार्या शरयू भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुस्तक दिनानिमित्त (दि.२३) शाळेतील फळ्यावर विविध रंगीत खडूंच्या सहाय्याने रेखाटलेली पुस्तकांची आकर्षक चित्रे गोमटा संदेश देऊन गेली.

### पंडित डॉ. तपन गुरुजी यांची प्रमुख समन्वयकपदी नियुक्ती

**नाशिक ।** शाक्त उपासक पंडित डॉ. तपन गुरुजी यांची अखिल भारतीय संत समिती,



धर्म समाज, नाशिकच्या धार्मिक कक्षाचे प्रमुख समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष महंत डॉ.अनिकेतशास्त्री देशपांडे महाराज यांनी ही नियुक्ती केली. महर्षि पंचायत सिद्धपीठमच्या वतीने पंडित यांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच देव, धर्म, देश, गाय, गंगा, गायत्री आणि संतांच्या रक्षणासाठी डॉ.तपन गुरुजी ही जबाबदारी योग्य भावनेने पार पाडतील अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे. सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

### 'पुस्तकावर बोलू काही' उपक्रमाच्या अध्यक्षपदी मधुकर गिरी



**नाशिक ।** सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक विद्यापीठ म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या 'पुस्तकावर बोलू काही' या अभिनव उपक्रमाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक मधुकर गिरी यांची निवड करण्यात आल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश पवार, कार्याध्यक्ष रवींद्र मालुंजकर आणि समन्वयक संजय आहेर यांनी दिली. अध्यक्ष मधुकर गिरी यांच्यासह सोमनाथ साखरे, ॲड.मिलिंद चिंधडे (उपाध्यक्ष), अलका दराडे (कार्यवाह), मुक्तेश्वर मुनशेट्टीवार (सरचिटणीस), दत्तात्रय कोठावदे (सचिव) या पदाधिकाऱ्यांसह सदस्य म्हणून तु.सी.ढिकले, अशोक पाटील, रमेश देसले, दतात्रय दाणी, शरद पवार, अर्जुन वेलजाळी, सुनंदा पाटील, वैजयंती सिन्नरकर, मुक्ता चिंधडे यांची आणि स्मारक प्रतिनिधी विजय राऊत, प्रसिद्धीप्रमुख आकाश पवार यांचीही निवड करण्यात आली. समन्वयक म्हणून सलग दुसऱ्यांदा संजय आहेर कार्य करणार आहेत. गेल्या दीड वर्षांपासून नाशिक येथे 'पुस्तकावर बोलू काही' या राज्यातील अभिनव या उपक्रमाद्वारे नाशिक जिल्ह्यातील विविध साहित्यिकांना व्यक्त होण्यासाठी दर मंगळवार आणि शुक्रवारी सायंकाळी ६ ते ७ या वेळेत हुतात्मा स्मारक येथे ऐसपैस गप्पांचे आयोजन केले जाते. आत्तापर्यंत सुमारे १३१ साहित्यिक या उपक्रमात सहभागी होऊन त्यांनी आपल्या पुस्तकावर ऐसपैस गप्पा केल्या आहेत. पुढील पाच वर्ष अविरत भरणारा हा अक्षरयज्ञ २६ फेब्रुवारी, २०२९ पर्यंत सुरू राहणार असल्याचे नियोजन झाल्याची माहिती गिरणा गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश पवार यांनी दिली. नवीन कार्यकारी मंडळाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### राज्य क्लासिक संघाची बैठक संपन्न

**नाशिक ।** महाराष्ट्र राज्य कला शिक्षक संघाची बैठक हुतात्मा स्मारक येथे नुकतीच उत्साहात पार पडली. यावेळी प्रदेशाध्यक्ष प्रल्हाद साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली दत्तात्रय सांगळे, राजेंद्र लोखंडे, मिलिंद टिळे, चंद्रकांत सामंत, सचिन पगार, योगेश रोकडे आदींसह कलाशिक्षक उपस्थित होते. यावेळी राजा रविवर्मा यांची जयंती साजरी करणे, राज्याचे शिक्षणमंत्र्यांना कला शिक्षकांच्या पवित्र पोर्टल भरती संदर्भात निवेदन देण्यासाठी भेट घेण्याबाबत चर्चा करण्यात आली. राजा रविवर्मा जीवनगौरव पुरस्कार जाहीर करणे बाबत दत्तात्रय सांगळे यांनी यावेळी सूचना केली. यावेळी प्रास्ताविक राजेंद्र लोखंडे यांनी केले. मिलिंद टिळे यांनी आभार मानले. निखिल वागळे यांचे चिरंजीव पार्थ वागळे यांचा कलाशिक्षक संघ व आणि तर्फे सन्मान करण्यात आला. यावेळी अनिसचे डॉ. टी आर गोराने, कृष्णा चांदगुडे आदी उपस्थित होते.

# || वाचा आणि समृद्ध व्हा... ||

जागतिक पुस्तक दिवस म्हणून दरवर्षी २३ एप्रिल रोजी साजरा केला जातो. जागतिक पुस्तक दिन, ज्याला जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिवस किंवा आंतरराष्ट्रीय पुस्तक दिवस म्हणूनही ओळखले जाते, हा वाचन, प्रकाशन आणि कॉपीराइटला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना (UNESCO) द्वारे आयोजित केलेला वार्षिक कार्यक्रम आहे. पहिला जागतिक पुस्तक दिन २३ एप्रिल १९९५ रोजी साजरा करण्यात आला.

जगप्रसिद्ध साहित्यिक विल्यम शेक्सपियर याचा २३ एप्रिल हा जन्मदिवस तसेच मृत्यू दिवसही आहे. दरवर्षी २३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक दिन भारतातही साजरा केला जातो. लोकांना पुस्तके वाचण्यासाठी आणि प्रकाशित करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी आणि जागृत करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. सध्या इंटरनेट या माध्यमामुळे बऱ्याच प्रमाणात तरुण पिढी पुस्तकापासून थोडी दूर जात आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. प्रत्यक्ष पुस्तक हातात घेऊन वाचणे आणि इंटरनेटवर वाचन करणे यात खूप फरक आहे. प्रत्यक्ष पुस्तक वाचण्याचा आनंद हा वेगळाच असतो. लहान मुलांवर सुरुवातीपासून संस्कार करण्यासाठी त्यांना संत चरित्रे, ऐतिहासिक पुस्तके, थोरामोठ्यांची चरित्र-आत्मचरित्र हे वाचून दाखवली जातात. त्यातल्या गोष्टी सांगतात. त्यामागचा उद्देश हाच असतो. पुढील काळात त्यांनाही ही पुस्तके वाचण्याची इच्छा व्हावी. त्यातूनच त्याचे मनावर संस्कार व्हावे.

वाचकांपर्यंत पुस्तके पोहोचवण्यासाठी आणि वाचनाची आवड वृद्धिंगत व्हावी म्हणून १९७५-७६ सुमारास दिनकर गांगल, कुमार केतकर, अरुण साधू, अशोक जैन,प्र. ना.परांजपे, या मान्यवर मंडळीने "ग्रंथाली वाचक चळवळीची" स्थापना करून महाराष्ट्रभरात अगदी तालुका पातळी पर्यंत ही चळवळ पोहोचवली. आणि तीही स्वस्त दरात तसेच पुस्तक वाचका पर्यंत पोहोचवण्यासाठी नवीन नवीन प्रयोग केले. त्यात ग्रंथजत्रा, ग्रंथ मोहोळ, महाराष्ट्रात एकाचवेळी पन्नास ठिकाणी पुस्तक प्रदर्शन तेंडुलकरांची संवाद यात्रा, बाल झुंबड,वाचकदिन यासारखे अनेक प्रयोग होते. आणि त्यातून खूप मोठ्या प्रमाणात वाचकांचा प्रतिसाद मिळाला. तसेच ढवळे ग्रंथ यात्रा, अक्षरधारा ची पुस्तक प्रदर्शने, याद्वारे प्रयत्न झालेत. त्याचबरोबर नाशिक येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठान तर्फे विश्वस्त विनायक रानडे यांनी बारा वर्षापासून सुरू केलेला "ग्रंथ तुमच्या दारी" हा नवीन प्रयोग. जवळपास ५० हजारांहून अधिक वाचक याच्यात जोडलेले आहेत. पंधरा देशात दोन ते अडीच कोटी रुपयांची एक लाखापेक्षा जास्त पुस्तके त्यात आहेत. तीस ते पस्तीस व्यक्तीच्या गटास ही पुस्तकांची पेटी मिळू शकते. आतापर्यंत जवळपास दोन हजार पेट्यांचे वर वितरण झाले आहे. तसेच आपण वाढदिवस, स्मृतिदिन साजरे करतो, त्यानिमित्ताने १००० रुपये देऊन अशी पेटी दान करु शकतो.. एका चांगल्या कामाला आपण हातभार लावू शकतो. पुणे मध्ये १०० च्या जवळपास या पेट्यांची संख्या आहे. मराठी वाचक जेथे, ग्रंथ तुमच्या दारी तेथे.... अशा प्रकारे कार्य सुरू आहे.

पुंडलिक पै यांची डोंबिवली येथील पै फ्रेंड्स लायब्ररी. ही सुद्धा वाचकांसाठी नवनवीन कार्यक्रम करून वाचन संस्कृती वाढीस मोलाचे योगदान देत आहे. जवळपास दीड ते दोन लाख पुस्तके त्यांच्याकडे आहेत. लहान मुलांसाठी स्वतंत्र विभाग आहे. त्यांच्या सहासात शाखा आहेत. त्याच बरोबर बदलापूर येथील श्याम जोशी यांचे "ग्रंथसखा" वाचनालय याचाही उल्लेख करावा लागेल. त्यांनीसुद्धा सुरुवातीला व्यक्तीगत भांडवलातून हे वाचनालय सुरू केले. आज त्यांच्याकडे ६० ते ७० हजार मराठी ग्रंथ आहेत. आणि एक चांगले वाचनालय म्हणून नावारूपाला आले आहे. डोंबिवली, ठाणे, मुंबई, पुणे, आदी ठिकाणी काही वाचनालया मार्फत पुस्तक आदान प्रदान कार्यक्रम केला जातो त्यात आपल्या जवळचे वाचलेले पुस्तक देऊन जे पुस्तक वाचले नाहीत ते घेऊन जायचे.



जागतिक पुस्तक दिन

**दिलीप देशपांडे**

जामनेर, जिल्हा जळगाव

८९९९५६६९१७



अजून एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे अनेक जण वैयक्तिक पातळीवर वाचनासाठी प्रयत्न करीत आहेत. अश्याच माझ्या वाचनात काही गोष्टी आल्या त्या नमूद करतो.

● सोलापूर जिल्ह्यामध्ये काशीराम कोळी नावाचा तरुण बैलगाडीत पुस्तक घेऊन फिरतो. बैलगाडीतच फिरते वाचनालय सुरू केले आहे. गावोगावी तो पुस्तके घेऊन फिरतो. आणि लोकांना वाचायला प्रवृत्त करतो. त्याच्या गाडीमध्ये जवळपास पाचशे सहाशे पुस्तके असतात. ● अकोला शहरात गजानन नारे यांचेही असे फिरते वाचनालय आहे. मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी म्हणून ते पुस्तकाची गाडी घेऊन फिरतात. विद्यार्थीदशेतच वाचनाची आवड निर्माण व्हावी हा प्रामाणिक हेतू आहे असे ते सांगतात. अशी ही साहित्यप्रेमी मंडळी सुद्धा सेवा करून वाचन संस्कृती रुजवत आहे ही खरोखरच अतिशय समाधानाची,कौतुकास्पद गोष्ट आहे. ● जीवन इंगळे यांची लहानाबरोबर मोठयांनी पुस्तके वाचावे हीच त्यांची तळमळ आहे.



आणि म्हणून पुणे आणि सातारा जिल्ह्यातील अनेक गावांना त्यांनी भेट दिली आहे. पुस्तके ही सर्वात जवळची मित्र असतात आणि त्यांचे सानिध्यात राहिलो तर आपण विचारांनी समृद्ध होऊ अशी त्यांची भावना आहे. ● विदर्भातील वर्धा येथे सचिन सावरकर हे शिक्षक, पुस्तक दोस्ती जागर म्हणून कल्पना पुढे आणली आहे. पाच ते वीस वर्षे वयोगटातील बालक व युवकांना एकत्र आणून त्यांना पुस्तके वाचायला द्यायची आणि युवकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करायची. वाचन हा संस्कार असून लहानपणापासून मुलांवर रुजवण्याची गरज आहे ही त्यांची त्यामागची भूमिका आहे. या कामात त्यांना अजून काही शिक्षकांचे सहकार्य आहे. ● तामिळनाडू मध्ये एका केशकर्तनायात वाचनालय सुरू केल्याची बातमी वाचली होती. त्याच्या केशकर्तनालयात आठशे पन्नास पुस्तके आहेत. पुस्तक वाचून प्रामाणिक प्रतिक्रिया दिली तर ग्राहकाला तो 30 टक्के सवलत देतो. पुस्तक हा आपला चांगला सहकारी आहे असेच म्हणतो व आपल्या केशकर्तनालयात प्रतिक्षेत असलेल्यांना तो रिकामा वेळ जाऊ नये म्हणून पुस्तक हातात देतो. बघा म्हणजे मोठ्या प्रमाणा पासून तर लहान प्रमाणात वाचन वृद्धि व्हावी म्हणून किती प्रयत्न केले जातात. मध्यंतरी एक लेख वाचण्यात आला होता त्यात जर्मनीची पुस्तक विषय माहिती होती. त्यात म्हटले होते... ● जर्मनीमध्ये रस्त्याने पुस्तकांची कपाट असतात. त्या प्रत्येक कपाटात साधारणता दोनशे ते अडीचशे पुस्तके असतात. रस्त्याने जाणारा येणारा त्यातून पुस्तक घेऊ शकतो. कृपया तुमच्या आवडीची पुस्तके घ्या आणि योग्य वेळी ती परत करा, नवीन पुस्तकांची भर घातल्यास स्वागत आहे.अशी पाटी लिहिलेली असते. पुस्तकांनी सजलेली श्रीमंत घरच मला येथे अधिक भेटली असे लेखात लेखिकेने नमूद केले आहे. ● नासिक येथे ओझर विमानतळ रस्त्याने द रिलॅक्स कॉर्नर नावाचे हॉटेल रेस्टॉरंट आहे. विशेष म्हणजे या रेस्टॉरंट मध्ये वाचनालय आहे. हेतू हा की जेवणाबरोबरच येथे वाचनाची भूक भागवली जाते.निरनिराळ्या विषयावरची पुष्कळ पुस्तके या ठिकाणी आहेत. जेणेकरून जेवणाच्या आधी किंवा जेवणाच्या नंतर जो वेळ घालवतो त्या वेळात पुस्तक वाचावे, हाताळावे. हे रेस्टॉरंट भिमाबाई जोंधळे आणि त्यांचा मुलगा प्रवीण जोंधळे हे चालवतात. वेळ मिळेल तसे वाचनाचे महत्त्व ही सांगतात. या ठिकाणी झणझणीत झुणका पिठले, भाकरी, ठेचा, विशेष करून आहे. अनेक मान्यवरांनी भेट दिली आहे तसेच प्रवासीही या ठिकाणी थांबून जेवण करुन पुस्तक वाचनाचा लाभ घेतात. ● मुंबईमध्ये महानगरपालिका मार्फत झोपडपट्टी तेथे वाचनालय हे संकल्पना राबवली जाते. ● पुण्यात चपराक प्रकाशन अनेक नवनवीन विषयावर नवनवीन लेखकांची पुस्तके प्रकाशित करित आहे.

● महाराष्ट्र सरकारने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी पुस्तकाचे गाव ही संकल्पना राबवण्याचे ठरवले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात तसेच नवेगाव बांध, आंबेजोगाई,केशवसुत स्मारक मालगुंड अशा काही ठिकाणी पुस्तकाच्या गावासाठी निवड झाली आहे. आदेशही निघाले आहेत व अजून गावांची निवड करण्याचे काम सुरू आहे. आज महाराष्ट्रात मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यम वर्गात परिस्थिती बघितली तर घराघरांमधून मराठी शिकणाऱ्या मुलांचे प्रमाण कमी होते आहे. दुसरे म्हणजे पुस्तक खरेदीला आखडता हात घेतला जातो. मॉलमध्ये खरेदी हॉटेलमध्ये जेवण, वाढदिवस पार्टी यावर हजारांनी रुपये खर्च करतो पण दोनशे,अडिचशे रुपयाचे पुस्तक घ्यायला मागेपुढे बघतो. ही परिस्थिती नाकारून चालणार नाही. साहित्य संमेलनात पुस्तक खरेदी करणारा एक विशिष्ट वर्ग असतो. बाकी विंडो शॉपिंग करतात.

आपण थोरामोठ्यांच्या जयंती पुण्यतिथी साजरी करतो,(रस्त्याला) मार्गाला त्यांचे नाव देतो,पण त्यांनी सांगितलेला मार्गाने जात नाही. त्यांचे साहित्य आहे ते वाचत नाही ही फार मोठी शोकांतिका आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना पुस्तकाविषयी फार प्रेम होते. ज्यावेळी त्यांच्याकडे पुस्तक खरेदी करण्यासाठी पैसे नव्हते त्यावेळी ते ग्रंथालय उघडे त्यावेळी जात, व त्याची वेळ संपेपर्यंत तिचे वाचन करीत. नंतरच्या काळात मुंबई दादर येथील राजगुरू याठिकाणी बाबासाहेबांनी पन्नास हजार अधिक पुस्तकांचा संग्रह केला होता. आणि जगातील हे त्यांचे सर्वात मोठे व्यक्तिगत ग्रंथालय होते. त्यात विविध भाषांमधील ग्रंथाचा समावेश आहे. त्यांच्या वाचाल तर वाचाल या विचाराने अनेकांना प्रेरणा मिळाली. बाबासाहेब नेहमी म्हणत 'तुमच्याकडे दोन रुपये असतील तर त्यातील एक रुपयाची भाकरी घ्या आणि एक रुपयाचे पुस्तक" कारण भाकरी तुम्हाला जगायला मदत करेल तर पुस्तक तुम्हाला कसे जगावे हे शिकवेल. आज आपण बाबासाहेबांची जयंती पुण्यतिथी साजरी करतो प्रत्येक कार्यक्रमात त्यांचा उल्लेख करतो परंतु त्यांचे हे कार्य समोर आणणे सगळ्यांना माहीत करून देणे ही सुद्धा काळाची गरज आहे.

आता काही शहरात जसे पुणे, मुंबई ,सातारा अशा ठिकाणी पुस्तक महोत्सवाचे आयोजन केले गेले आणि त्यातून पुस्तक प्रकाशन आणि वाचन या दोन्ही गोष्टी साध्य केल्या गेल्यात. आपण असं वाचन करू या, यातूनही स्फूर्ती व प्रेरणा मिळेल व जगण्याचे नवीन मार्ग सापडतील. मुलांमध्ये संस्काराचे बीज पेरल जाईल. सकारात्मक विचार मिळेल, अशाच वाचनाची गरज आहे. वाचाल तर समृद्ध व्हाल .तेव्हा खूपच चांगल आणि सकस वाचा. आपल्या जाणिवा समृद्ध करा.

dilipdeshpande24@gmail.com

## आ. सीमा हिरे यांच्या सहकार्याने दिव्यांग बांधवांना अर्थसहाय्य सुरू



**सिडको ।** दिव्यांग अर्थसहाय्य योजनेंतर्गत मासिक ३००० रुपये आर्थिक सहाय्य सुरू झाल्याने दिव्यांग बांधव गणेश मधुकर भोई (वय ३४) आणि यशवंत मधुकर भोई (वय ३३) दोघे रा. पाटीलनगर, त्रिमूर्ती चौक, सिडको, नाशिक यांनी आमदार सीमा हिरे यांची भेट घेऊन कृतज्ञता व्यक्त केली.

कमी उंची असलेले आणि शारीरिक विकास पूर्णत्व न झालेले गणेश भोई व यशवंत भोई या दोन्ही भावंडांनी आमदार हिरे यांच्या जनसंपर्क कार्यालयात येऊन थेट आभार मानले. भोई भावंडांनी दिव्यांग अर्थसहाय्य योजनेकरिता अर्ज दाखल केले होते. त्यानुसार त्यांना प्रत्येकी मासिक अनुदान रक्कम रुपये ३०००/- सुरू झाले आहे. त्यांना या कामासाठी नाशिक पश्चिमचे आ. हिरे यांच्या कार्यालयाचे योजनाप्रमुख सुभाष जगताप यांनी सहकार्य केले होते. याप्रसंगी भोई बांधवांनी आ. हिरे यांचे आभार मानताना सांगितले की, ताईमुळे आम्हाला शासकीय योजनेचा लाभ मिळाला असून, यापुढे आम्हाला उद्योग व्यवसाय सुरू करावयाचा आहे. आमच्या पाठीशी यापुढेही आमदार मॅडम यांनी भक्कमपणे उभे राहावे, असा आशावाद आभार प्रदर्शन करताना केला. प्रसिद्धी शिखरावर पोहोचलेला कपिल शर्मा यांच्या कॉमेडी शो मध्येदेखील दोघा भावांनी भाग घेतला होता. यावेळी गणेश व यशवंत यांनी सिने अभिनेते रितेश देशमुख, विवेक ओबेराय यांच्या समवेत नृत्य केल्याचे व विनोद केल्याचे व्हिडिओ त्यांनी यावेळी सर्वांसमोर शेअर केले. यावेळी दोन्ही भावंडांचे रश्मी हिरे बेंडाळे यांनी कौतुक केले. सत्कार प्रसंगी आ. हिरे, भाजप नेते महेश हिरे, डॉ. श्री वैभव महाले, डॉ. विनय मोगल, ॲड. परमानंद पाटील, सरचिटणीस रश्मी हिरे बेंडाळे, योजना प्रमुख सुभाष जगताप आदी उपस्थित होते.

## उद्योजक वासू श्रॉफ यांना जुन्या घड्याळामुळे त्रास

### जयपूर विमानतळावर कस्टम अधिकाऱ्यांकडून अडवणूक

**देवळाली कॅम्प ।** दुबई स्थित प्रसिद्ध उद्योजक आणि प्रवासी भारतीय सन्मान प्राप्तकर्ता वासू श्रॉफ (वय ८४), यांना जयपूर आंतरराष्ट्रीय विमानतळावर कस्टम अधिकाऱ्यांकडून तपासणीच्या नावाखाली अडवून त्रास दिला गेला. ते व्हीलचेअरवर होते. त्यांनी स्वतःहून घोषित केलेल्या दहा वर्ष जुन्या वैयक्तिक घड्याळासाठी त्यांना चार तासांहून अधिक वेळ थांबवण्यात आलं. या दरम्यान त्यांना पाणी, औषधं किंवा कोणतीही सोय पुरवली गेली नाही. श्रॉफ एका कौटुंबिक समारंभ आणि मंदिराच्या उदघाटनासाठी सिकारला गेले होते. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की ते घड्याळ परत नेत असून त्याचं मूळ बिल आणि प्रमाणपत्र दाखवलं होतं. तरीही त्यांच्यावर "घड्याळ लपवण्याचा" आरोप करण्यात आला आणि INR ३.५ मिलियन (AED १,५१,२३७) मूल्य ठरवून ३९% कस्टम ड्युटी मागितली गेली. माझ्यावर गुन्हेगारा सारखी वागणूक झाली, असे श्रॉफ यांनी सांगितले. त्यांना त्यांच्या औषधांशिवाय थांबवले गेले आणि नातेवाईकांच्या समारंभालाही हजर राहता आलं नाही. अखेरीस त्यांना घड्याळ विमानतळावर ठेवून पुढे जावं लागलं.

दिल्ली उच्च न्यायालयाने अलीकडेच दिलेल्या निर्णयात स्पष्ट म्हटले आहे की, प्रवाशांनी परिधान केलेली वैयक्तिक दागिने किंवा वारसा वस्तू योग्य कारणांशिवाय जप्त करू नयेत. या प्रकरणात हीच बाब दुर्लक्षित केली गेली. श्रॉफ यांचे वकील धर्मेंद्र सिंग यांनी दुसऱ्या दिवशी कस्टम अधिकाऱ्यांशी संपर्क साधून मानवतेच्या आधारावर वस्तू परत देण्याची मागणी केली. काही दिवसांच्या विलंबा नंतर, INR १०,००० दंड भरून घड्याळ परत मिळालं. ही घटना एनआरआय प्रवाशांशी होणाऱ्या गैरवर्तनावर पुन्हा प्रकाश टाकते. श्रॉफ यांनी आता कायदेशीर कारवाईचा निर्णय घेतला असून, असे प्रसंग इतर भारतीयांवर घडू नयेत यासाठी ते पुढाकार घेणार आहेत.



### वासू श्रॉफ यांच्याबद्दल थोडक्यात...

श्रॉफ मूळचे देवळाली कॅम्पचे आहेत. १९६० साली वयाच्या १९ व्या वर्षी दुबईत आलेल्या श्रॉफ यांनी 'रेगल ग्रुप'च्या माध्यमातून वस्त्र व्यवसायात साम्राज्य उभं केलं. आज त्यांच्या व्यवसायात रिअल इस्टेट, टेक्नॉलॉजी, मॅन्युफॅक्चरिंग आणि फायनान्स अशा विविध क्षेत्रांचा समावेश आहे. ते समाजसेवा आणि धार्मिक प्रकल्पांमध्येही सक्रिय असून १०१ मंदिरांची निर्मिती हे त्यांचं ध्येय आहे.

## समाजातील सर्व घटकांचा सर्वांगिण विकास हेच ध्येय...!

### पंडित दिनदयाळ उपाध्याय एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सव

१९६५ साली २२ ते २५ एप्रिल दरम्यान पंडित दिनदयाळ उपाध्याय यांनी मुंबईतील रुईया महाविद्यालय परिसरात एकात्म मानव दर्शन व अंत्योदय बाबत विचार प्रथम मांडले आज ह्या घटनेला ६० वर्षे पूर्ण होत आहेत ह्या घटनेच्या स्मृती जोपासण्यासाठी महोत्सव साजरा करण्यात येत आहे. कार्यक्रमाचे उदघाटन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री देवेंद्रजी फडणवीस करणार आहेत कार्यक्रममात महाराष्ट्राचे राज्यपाल मा. श्री सी. पी. राधाकृष्णन केंद्रीय मंत्री मा. श्री पियुष गोयल, मनमोहन वैद्य, सुनील आंबेकर, बी. एल. संतोष, सुरेश सोनी यांसारख्या चे मार्गदर्शन लाभणार आहे राष्ट्रभक्ती चा जागर आणि प्रेरणादायी विचार महोत्सवात मान्यवर मांडणार आहेत. २२ ते २५ एप्रिल २०२५ दरम्यान "पंडित दिनदयाळ उपाध्याय एकात्म मानव दर्शन महोत्सव " रुईया महाविद्यालयात आयोजित करण्यात आला आहे. त्याकाळात भारतीय जनसंघातुन पंडित दिनदयाळ उपाध्याय यांनी राष्ट्रनिष्ठा, कर्तव्य भावना, आणि अंत्योदय यांसारखी मुल्ये रुजविली



भाजपचे नेते व पंतप्रधान म्हणून कित्येक वर्षांनंतर अटलबिहारी वाजपेयी यांनी पंडित दिनदयाळ उपाध्याय यांची मुल्ये राज्य कारभारात राबविण्याची प्रथम संधी मिळाली आदरणीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री देवेंद्रजी फडणवीस यांचे कार्य देखील त्याच आधारावर आहे त्यामुळे जनतेने शेवटच्या घटके पर्यंत विकास पोहचविण्याचा प्रयत्न अनुभवला आणि तिसऱ्यांदा मोदी पंतप्रधान पदी निवडुन आले. भाजपची राजकीय उंची हा शाश्वत विचारधारेशी आधारित प्रदीर्घ वाटचालीचा परिणाम आहे या वाटचालीवर पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या एकात्म मानव दर्शन व अंत्योदय चा विलक्षण प्रभाव आहे राजकारण हे समाज सेवेचे माध्यम आहे देशाची प्रगती ही सर्वांगीण विकासावर आधारित असावी व्यक्ती घ्या व समाजातील सर्व घटकांच्या एकसंघावय आधारित असावी. पंडित दिनदयाळ उपाध्याय यांनी भारतीय राजकारणात एकात्म मानव दर्शन, अंत्योदय यांसारख्या संकल्पना मांडुन समाजातील शेवटच्या घटकांचा विकास व्हावा, यांसाठी प्रयत्न केले आज देशपातळीवर आणि महाराष्ट्रात राबविल्या जाणाऱ्या सर्व योजनांमुळे पंडित दिनदयाळ उपाध्याय यांची मुल्ये झळकतात आज त्यांच्या विचारांची मुल्ये जोपासताना आपल्या कृतीत त्यांची मुल्ये दिसली पाहिजेत याचे आपण सर्वांनी पालन करुया..!



**श्री. प्रदीप पाटील, भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य,**
**मो. ९९६०४९५४९५**

## महत्त्वाचे

### तीन रेशन दुकानदारांचे परवाने झाले रद्द

**नाशिक ।** ई केवायसी नोंदणीत हयगय करणाऱ्या तिघा रेशन दुकानदारांवर जिल्हा पुरवठा विभागाने कारवाईचा बडगा उगारला आहे. या कारवाईत विभागाने त्यांचे परवाने रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. या कारवाईमुळे रेशन दुकानांमध्ये खळबळ उडाली असून चर्चा सुरू आहे. दरम्यान, २८ तारखेला पुढील सुनावणी होणार असल्याचे सुत्रांनी सांगितले. शासनाच्या शंभर दिवसांच्या कृती कार्यक्रमांतर्गत पुरवठा विभागाने ई केवायसी नोंदणीसाठी पावले उचलले आहेत. सर्व रेशन दुकानदारांना त्यांच्याकडे लाभार्थ्यांची शंभर टक्के केवायसीची प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना केल्या होत्या. वारंवार पाठपुरा करूनही ६५ दुकानदारांनी ५०% च्या आत असल्याचे समोर आले होते. त्यामुळे संबंधित दुकानदारांना नोटीसा बजावत सुनावणीसाठी हजर राहायचे होते. त्यानुसार सोमवारी (दिनांक २१) जिल्हा पुरवठा अधिकारी कैलास पवार यांच्याकडे सुनावणी झाली. त्यात बागलाण तालुक्यातील डांग सौंदाणे, पारनेर व अंतापूर येथील रेशन दुकानदार गैरहजर होते. संबंधित दुकानावर यापूर्वी दोनदा समज देऊही त्यांच्या कामकाजासह सूत्रता नसल्याचे दिसून आले. सुनावणीला बोलवूनही अनुपस्थित राहिल्याने कैलास पवार यांनी या तिघा दुकानदाराचे परवानगी रद्द करण्याचे आदेश यंत्रणांना दिले.

### महाविद्या साधना मंच देणार निराधार तरुणांना ‘आधार’

**नाशिक ।** वय वर्षे १८ ते ४५ दरम्यानच्या फक्त पुरुष वर्गातील १०० टक्के अनाथ, निराधार आणि निराश्रित तरुणांना ‘आधार’ देण्याचे काम ‘महाविद्या साधना मंच’ हे करणार आहे. समाजातील अशा तरुणांना या मंचा तर्फे साद घातली आहे. निराधार बालक, अल्पवयीनांना आधार देण्यासाठी समाजात अनेक संस्था आणि संघटना कार्यरत आहेत. परंतु १८ वय पूर्ण झाल्यानंतर म्हणजेच सज्ञान झाल्यानंतर अशा तरुणांना पुढील आयुष्य जगणे कठीण होऊन बसते. कारण कायद्यानुसार १८/२१ वय पुर्ण झाल्यावर अशा अनाथ, निराधार आणि निराश्रितांना त्यांच्या संबंधित आश्रय संस्थांमधील त्यांचे निवारागृह सोडावे लागते. अशा वेळी आयुष्यात केवळ तग धरण्यासाठीच्या प्रसंगीदेखील त्यांना मोठ्या संकटांना तोंड द्यावे लागत असते. अशा निराश्रितांना कोणताही आधार व जीवन जगण्यावश्यक असे मार्गदर्शन आणि शिक्षण मिळत नसल्यामुळे ते अयोग्य मार्गाकडे वळण्याची शक्यता असते. त्यांच्या आयुष्याला योग्य दिशा न मिळाल्याने ते भरकटण्याचीच शक्यता अधिक असते. परिणामी, अशा मार्ग चुकलेल्या तरुणांकडून समाजात गुन्हेगारीसारख्या घटना वाढीस लागण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. ही बाब लक्षात घेऊन ‘महाविद्या साधना मंच’ने १८ ते ४५ वयापर्यंतच्या केवळ पुरुष वर्गातील १०० टक्के अनाथ, निराधार आणि निराश्रित अशा युवा-तरूणांच्या कायमस्वरूपी निवाऱ्यासाठी आणि जीवन जगण्यावश्यक असे मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यासाठी उपक्रम हाती घेतला आहे. अशा तरुणांनी अथवा त्यांच्या हितचिंतकांनी अधिक माहितीसाठी 8390792359 या व्हॉट्सॲप क्रमांकावर संदेश पाठवावा, अथवा ‘महाविद्या साधना मंच कार्यालय, शुभलाभ हौ. सोसायटी, क्रांतीनगर, मखमलाबाद रोड, पंचवटी, नाशिक येथे संपर्क साधावा, असे आवाहन मंचातर्फे करण्यात आले आहे.

### केटीएचएममध्ये ‘आपली शक्ती, आपला ग्रह’

**नाशिक ।** वसुंधरा दिन हा केवळ एक औपचारिक दिवस नसून पृथ्वीवरील जीवनाच्या शाश्वततेसाठी आपली जबाबदारी समजून घेण्याचा आणि कृतीशील होण्याचा दिवस आहे. पृथ्वीवरील निसर्ग, जैवविविधता, वनसंपदा, जलसंपदा हीच खरी संपत्ती असून, हवामान बदल, जंगलतोड, जलप्रदूषण, प्लास्टिकचा सुळसुळाट यावर मात करण्यासाठी सर्वांनीच आपापल्या पातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन हिरे महाविद्यालयातील भूगोल विभागप्रमुख डॉ. राकेश पाटील यांनी केले. मराठा विद्या प्रसारक समाजाच्या केटीएचएम महाविद्यालयातील भूगोल विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने वसुंधरा दिनानिमित्त “आपली शक्ती, आपला ग्रह” या थिमवर आधारित कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. डॉ. पाटील हे मविप्रचे सभासद आणि केटीएचएम महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. ‘केटीएचएम’चे प्राचार्य डॉ. एस. एस. काळे यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम संपन्न झाला. प्रारंभी भूगोल विभागप्रमुख डॉ. ज्ञानेश्वर पवार यांनी प्रास्ताविक व स्वागतपर भाषण केले. पर्यावरण संवर्धनासाठी केवळ चर्चा न करता कृती करणे गरजेचे आहे. प्रेरणादायी विचारांनी त्यांनी विद्यार्थ्यांना जागरूक आणि प्रेरित केले. अध्यक्षस्थानी प्रा. पी. व्ही. जाधव होते. अध्यक्षीय मनोगतात ते म्हणाले, सतत वाढणारी लोकसंख्या, शहरीकरण आणि औद्योगिकीकरण यामुळे पर्यावरणाचे संतुलन ढासळत असून, याचे परिणाम केवळ नैसर्गिक आपत्तींमध्ये नाही तर मानवी आरोग्यावरही दिसून येत आहेत, असे विचार मांडले. माधुरी जाधव यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. राजेंद्र गुंजाळ यांनी आभार मानले. कार्यक्रमास दिंडोरीतील आनंद ॲग्रोचे गणेश घुगे, भूगोल विभागाचे प्रा. डॉ. राजेंद्र गुंजाळ, डॉ. सतीश हांडगे, प्रा. विलास लवंड, कविता नवले, चारुशिला निकम, गणेश खांदवे, भूगोल विभागाचे माजी विद्यार्थी उपस्थित होते.

# बहादुरी गावात पुणेगाव कालव्याचे कामच झाले नसल्याचे धक्कादायक वास्तव





## सिंचन विभागात बोगस बिले मंजूर करून घेणारे रॅकेट? अधिकाऱ्यांचे मौन

**नाशिक ।** सिंचन विभागातील पुणेगाव डावा कालव्याच्या कामात मोठा भ्रष्टाचार झाल्याचे दै. ‘महासागर’ने उघड केल्यानंतर सिंचन विभागात मोठी खळबळ उडाली असून या कामाच्या संदर्भात सखोल चौकशीची मागणी केली जात आहे. या प्रकरणात अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट कारभाराचा बुरखा फाटल्यामुळे तोंड लपविण्याची नामुष्की आली आहे. दरम्यान चांदवड तालुक्यातील बहादुरी गावात कालव्याचे कुठलेही काम झालेले नसताना आठ कोटी रुपयांचे बिल काढून घेतल्यामुळे अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे. कालव्याचे काम मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असताना अधिकाऱ्यांनी कशाच्या आधारावर इतक्या मोठ्या रकमेचे बिल मंजूर करून घेतले असा सवाल उपस्थित केला जात असून सिंचन विभागात बोगस बिल मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांचे रॅकेट कार्यरत आहे का? असाही संशय व्यक्त केला जात आहे.





पुणेगाव डावा कालवा
पंचनामा
सुधीर उमराळकर

नांदूर मध्यमेश्वर प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता मनोजकुमार डोकचोळे यांच्याकडून कुठलीही या गैरप्रकाराबाबत कुठलीही प्रतिक्रिया येत नसल्याने या गैरव्यवहारात त्यांचा काही संबंध आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.सिंचन विभागातील नांदूर मध्यमेश्वर प्रकल्प विभागातील पुणेगाव डाव्या कालव्याचे ६३ किलोमीटर पर्यंतचे मातीकाम,अस्तरीकरणाचे काम सुरू असून या कालव्याच्या प्रवाहाच्या टप्प्यात येणाऱ्या बहुतांश गावामध्ये कामे झालीच नसल्याचे आढळून आले आहे. चांदवड तालुक्यातून हा कालवा जात असताना तालुक्यातील बहादुरी या गावात कालव्याचे काम झाले नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. असे असताना बिले मंजूर करण्याची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांवर आहे त्यांनी कुठलीही शहानिशा न करता किंबहुना प्रत्यक्ष स्थळावर कामाची पाहणी न करता आठ कोटी रुपयांचे बिल मंजूर केले आहे. त्यामुळे सिंचन विभागातील मोठे रॅकेट या प्रकरणात सहभागी असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांची भूमिका देखील संशयास्पद असल्याचे दिसून येते. पुणे गाव कालव्याच्या अस्तरीकरण व नूतनीकरणाची कुठलीही गरज नसताना या कामाचा घाट घालण्यात आल्याचे बोलले जाते. या कामामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार असल्याची प्रतिक्रिया बहादूरी येथील ग्रामस्थांनी व्यक्त केली. मार्च एंडच्या नावाखाली १२ कोटी रुपयांचे बिल महामंडळाला सादर केल्यामुळे अधिकाऱ्यांची खऱ्या अर्थाने पोलखोल झाली आहे. या प्रकरणी चौकशी करताना बहादुरी गावाची पाहणी केल्यानंतर अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट कारभाराचा बुरखा फाटला आहे. त्यामुळे या प्रकरणाची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करण्यात येऊन दोषी अधिकारी आणि ठेकेदार यांच्या विरुद्ध कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

**सिंचन विभागाशी संबंधित कुठलीही तक्रार असल्यास मो. ८६०५३८४९२५ या नंबरवर संपर्क साधावा.**

## राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

### आ. कांदे यांच्या उपस्थितीत हाती घेतला भगवा



**नांदगाव ।** नांदगाव शहर राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस अजित पवार गटाचे शहराध्यक्ष दया जुन्नरे यांच्यासह शेकडो तरुण कार्यकर्त्यांनी आ. सुहास अण्णा कांदे यांच्या निवासस्थानी शिवसेनेत (शिंदे गटात) जाहीर प्रवेश केला.

याप्रसंगी आ. कांदे यांनी सर्व तरुणांचे पक्षात स्वागत करत शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन दिले व पक्ष प्रवेश करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी उदय जुन्नरे यांनी आ. कांदे यांच्याकडून कार्यकर्त्यांना माणूस सन्मान, मतदारसंघात केलेला विकास पाहून आम्ही शिवसेनेत प्रवेश करीत आहोत. याआधीचे राजकीय नेते फक्त निवडणुकीपर्यंत आले आणीबाणीचा उपयोग करून घेतला. पण कांदे नेहमी कार्यकर्त्यांची विचारपूस करतात. त्यांच्या सुखदुःखात सामील होतात. म्हणून आम्ही सर्वांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले.

यावेळी आ. कांदे व शिवसेना जिल्हाप्रमुख फरहान खान यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. यावेळी दया जुन्नरे यांच्यासह सचिन सोमासे, सुरज कामोदकर, आशिष बागुल, दिगंबर जाधव, किरण जुन्नरे, अमोल जुन्नरे, रवींद्र जुन्नरे, अजय सापटे, धीरज कामोदकर, काना खैरनार, रोशन वळावे, राजेश खैरनार आदींसह शेकडो तरुणांनी शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख प्रहानखान, अमोल नावंदर, तालुकाप्रमुख सागर हिरे, प्रकाश शिंदे, गंगाधर येथील शाखाप्रमुख दिगंबर भागवत, माजी सरपंच सचिन जेजुरकर, भगीरथ जेजुरकर, सुनील खैरनार, संदीप खैरनार, मंगेश आहेर, दत्तात्रय सोमासे, संजय कामोतदकर, संदीप खैरनार, मुकुंद खैरनार, गोकुळ जेजुरकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## अभिनेत्री शिल्पा शेट्टीने घेतले सप्तश्रृंगीचे दर्शन

**कळवण ।** अभिनेत्री शिल्पा शेट्टीने तिच्या आईसोबत आदिमाया सप्तश्रृंगी देवीचे शनिवारी (दि. १९) दर्शन घेतले. यावेळी तिच्या परिवारातील इतरही सदस्य उपस्थित होते. शनिवारी गडावर आल्यावर त्यांनी पर्णीक्युलर ट्रालीने येत देवीचे दर्शन घेतले. कोणतीही खास वागणूक न घेता त्यांनी सामान्य नागरिकांप्रमाणे दर्शन घेतले. यापूर्वीही शिल्पा सन २०२२मध्ये दर्शनासाठी आल्या होत्या. देवीचे तेजोमय स्वरूप पाहून मन प्रसन्न झाल्याची प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. श्री सप्तशृंगी निवासिनी देवी ट्रस्ट कार्यालयात विश्वस्त भूषणराज तळेकर यांनी त्यांचा सत्कार केला.

## समाज माध्यमांवर व्हिडिओ प्रसारित होताच शासकीय यंत्रणा झाली जागी

**पेठ ।** तालुक्यातील कुंभाळे ग्रामपंचायत अंतर्गत बोरीचीबारी येथील पाणी टंचाई बाबत (दि.२० रोजी) पाणी भरण्यासाठी खोल विहीरीत महिला दोराच्या सहाय्याने खाली उतरून पाणी भरत असल्याचे समाज माध्यमातून प्रसारीत झाल्याने प्रशासनाची जाग आली त्याच दिवशी येथील एका विहीरीत टँकरने पाणी टाकण्यात आले.



मात्र कोरड्या विहीरीत पाणी टाकल्याने ते पिण्यास योग्य नसल्याने गाळमिश्रित झाले नागरिकांच्या म्हणण्यानुसार गावातील प्रत्येक घरासमोर एक मोठा पाण्याचा ड्रम ठेवतो तो भरून देण्याची मागणी करता ती प्रशासनाने मान्य करत पाणी वाटप सुरू करण्यात आले. मात्र प्रशासनास हा व्हिडीओ प्रसारित होण्याची वाट पहावी लागली.

## अल्पसंख्याक विकास विभागाच्या योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी : ललित गांधी

**नाशिक ।** अल्पसंख्याक विकास विभागामार्फत अल्पसंख्याक बहुल नागरी व ग्रामीण क्षेत्रात पायभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विविध योजना राबविण्यात येतात. या योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजवाणी व्हावी, अशा सूचना जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष तथा राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य ललित गांधी यांनी बैठकीत दिल्या.



मंगळवारी (दि.२२) जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मध्यवर्ती सभागृहात आयोजित आढावा बैठकीत गांधी बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ, जिल्हा नियोजन अधिकारी योगेंद्र चौधरी, त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी डॉ. श्रेया देवचक्के, वनप्रकल्प विभाग नाशिकचे विभागीय व्यवस्थापक डॉ. सुजित नेवसे, सुमेर काळे , सुमित बोरा, विजय बेदमुथा, संजय सोनवणे ,महेश शहा, प्रकाश बोथरा, ऋषिकेश कोंडेकर, यांच्यासह अधिकारी व जैन समाजाचे पदाधिकारी उपस्थित होते. गांधी म्हणाले की, नाशिक जिल्ह्यातील जैन सामाजातील प्राचीन तीर्थक्षेत्रांचे संरक्षण व संवर्धन होण्याच्या दृष्टीने यासोबतच जैन साधू व संत हे पायी प्रवास करतात त्यांची मुक्कामासह सुरक्षिततेच्या दृष्टीनेही उपयायोजना कराव्यात. यासाठी जागा उलब्धतेसह शासनाकडे प्रस्ताव सादर करावेत. अल्पसंख्याक महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाच्या विक्री व्यवस्थेसाठी महानगरपालिका क्षेत्रात शाश्वत स्वरूपाची जागा उपलब्ध करून मिळावी. तसेच नाशिक शहर,चांदवड व वणी तालुक्यातील जैन मंदिरांच्या विकासासाठी सिंहस्थ कुंभमेळा आराखड्यात याबाबत समावेश करण्यात यावा, अशा सूचनाही गांधी यांनी यावेळी दिल्या. जिल्हा नियोजन अधिकारी चौधरी यांनी यावेळी अल्पसंख्याक विकासासाठी राबविलेल्या विविध योजनांच्या माहितीचे सादरीकरण यावेळी केले.

## नाशिकमध्ये राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेची तयारी पूर्ण

### २६ व २७ एप्रिल रोजी होणार स्पर्धा

**नाशिक ।** नाशिक ॲथलेटिक्स फाउंडेशन (NAF) तर्फे आयोजित तिसरी राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धा २०२५ दिनांक २६ व २७ एप्रिल रोजी महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथील सिंथेटिक ट्रॅकवर भव्य स्वरूपात पार पडणार आहे.

या संदर्भातील पत्रकार परिषद नुकतीच NAF चे अध्यक्ष डॉ. मुस्तफा टोपीवाला यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये वय ६ ते १८ वय गट तसेच खुल्या गटासाठी खेळाडूंची नोंदणी पूर्ण झाली असून, राज्यातील विविध जिल्ह्यांमधून स्पर्धकांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. जम्पिंग, थ्रोईंग व रनिंग या प्रकारांचा समावेश असलेल्या या स्पर्धांचे उद्दिष्ट ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविणे आहे, अशी माहिती NAF उपाध्यक्ष आणि भारतीय मीडिया फाउंडेशन महाराष्ट्र राज्य जनरल कमिटीचे चेअरमन हिरालाल लोथे यांनी दिली. यावेळी आंतरराष्ट्रीय धावपटू सुप्रिया तेवितीया यांनी उपस्थित खेळाडूंना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. आपल्या सुरुवातीच्या




कारकिर्दीत आलेल्या अडचणींचा उल्लेख करत त्यांनी नवीन पिढीला मेहनत, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोनाचा संदेश दिला. न्यू ग्रेस अकादमीचे चेअरमन राजेंद्र वानखेडे, सॉईल चार्जर टेक्नॉलॉजीचे चेअरमन प्रसाद मुखेकर यांनीही शुभेच्छा देत NAFच्या उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी स्पर्धेसाठी तयार करण्यात आलेल्या ट्रॉफी, मेडल्स, प्रमाणपत्र, टी-शर्ट, सायकल आदींचे अनावरण करण्यात आले.

NAF सचिव मंगेश राऊत यांनी यावेळी बोलताना सांगितले की, “या स्पर्धेतून उद्याचे आंतरराष्ट्रीय खेळाडू घडणार आहेत.” स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी NAF पदाधिकारी, पोलिस प्रशासन, जिल्हा प्रशासन, क्रीडा विभाग व विविध सामाजिक संस्था यांचे मोलाचे योगदान लाभले आहे.

देशात मशिदीखाली मंदीर आहे का? याचा शोध घेण्यात भारतातील एक मोठा वर्ग व्यस्त असताना, विदेशात मात्र नवनवीन शोध लावले जात आहेत. विजेची मर्यादित निर्मिती आणि मोठी मागणी ही जगभरात बिकट समस्या आहे. अशा परिस्थितीत विजेचे आणखी काही स्त्रोत शोधता येतील का? या दिशेने अनेक प्रगतीशिल देश काम करीत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आता व्यक्तीच्या चालण्यातून आणि इमारतीच्या भिंतीतूनही विजेची निर्मिती करता येवू शकणार आहे.

# भिंतीमधूनही वीज निर्मिती

पृथ्वी जागतिक तापमानवाढीला तोंड देत आहे आणि जगाच्या वाढत्या लोकसंख्येसह, ऊर्जेची मागणी देखील सतत वाढत आहे. पर्यावरणवाद्यांचा असा विश्वास आहे की पृथ्वी वाचवण्यासाठी ऊर्जेचा वापर कमी करणे आवश्यक आहे आणि जागतिक लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेता हे जवळजवळ अशक्य आहे. पण कल्पना करा की तुमच्या दैनंदिन कामांमधून ऊर्जा निर्माण होऊ लागली तर? याचा अर्थ असा की, जेव्हा तुम्ही तुमच्या घराबाहेर पायी चालता तेव्हा वीज निर्माण होते, तुमच्या शहराचा आवाज उर्जेत रूपांतरित होतो आणि तुमच्या घराच्या भिंती देखील ऊर्जा निर्माण करू शकतात.

**शहराच्या आवाजापासून वीज निर्मिती**

न्यूयॉर्क शहरात सरासरी ७० डेसिबल इतका सतत आवाजाची पातळी असते. जणू काही कोणीतरी तुमच्या कानाजवळ मिक्सर वाजवत आहे. शहरांच्या या ध्वनी प्रदूषणापासून वीज निर्मिती करण्याची तयारी आता शास्त्रज्ञ करत आहेत.

यासाठी पायझोइलेक्ट्रिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. म्हणजेच, असे पदार्थ जे दाब दिल्यावर वीज निर्माण करू शकतात. जसे की क्वार्ट्ज क्रिस्टल्स आणि पॉलिव्हिनिलिडीन फ्लोराइडसारखे लवचिक पॉलिमर. ध्वनी-कॅप्चर उपकरण १०० डेसिबलच्या आवाजापासून १०-५० मायक्रोवॅट/सेमी² पॉवर निर्माण करू शकते.


ऑस्ट्रेलियातील डीकिन विद्यापीठातील संशोधक हाओ शाओ आणि टॉंग लिन यांनी एक इलेक्ट्रोस्पन पॉलीएक्रिलोनिट्राइल नॅनोफायबर पडदा तयार केला आहे जो कमी-मध्यम वारंवारता (१००-५०० हर्ट्झ) आवाजाचे विजेमध्ये रूपांतर करू शकतो.

२०१९ मध्ये, फिलीपीन सायन्स हायस्कूल-वेस्टर्न विसायास कॅम्पसमधील ११ वीच्या पाच विद्यार्थ्यांनी एस-लाइट नावाचे उपकरण तयार केले. आवाजाचे विजेमध्ये रूपांतर करून, पॉवर बँक सारखी उपकरणे चार्ज करता येतात. ऑक्टोबर २०१९ मध्ये मलेशियामध्ये झालेल्या यंग इन्व्हेंटर्स चॅलेंजमध्ये या नवोपक्रमाला रौप्य पुरस्कार मिळाला.

ध्वनी प्रदूषणाचे विजेमध्ये रूपांतर करण्याचे तंत्रज्ञान अद्याप प्रायोगिक टप्प्यात आहे. सध्या ते एलईडी दिवे, सेन्सर किंवा लहान उपकरणांसाठी वीज निर्माण करू शकते. परंतु मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती करणे कठीण आहे.

**शहरांमधील गर्दी विजेचा स्त्रोत**

कल्पना करा की तुम्ही चालत आहात आणि तुमच्या प्रत्येक पावलाने वीज निर्माण होत आहे. यासाठी, काही शास्त्रज्ञांनी स्मार्ट टाइल्स तयार केल्या, ज्या पायझोइलेक्ट्रिक तंत्रज्ञानावर काम करतात आणि पायाच्या दाबाने वीज निर्माण करतात.




यूकेमधील पेवेगेन कंपनीने प्रथम लंडनच्या हीथ्रो विमानतळावर स्मार्ट टाइल्स बसवल्या. टाइल्सची रचना आणि मजबुती अशी आहे की त्या १० लाख पावलापर्यंत टिकतात. या टाइल्स प्रति पाऊल ७ वॅट वीज निर्माण करतात. २०१९ मध्ये, या टाइल्सने विमानतळाच्या डिस्प्ले लाइटिंगच्या १०% भागाला चालना दिली. आज या कंपनीने ३७ देशांमध्ये २५० ठिकाणी आपले ऊर्जा निर्मिती उत्पादन स्थापित केले आहे.

जपानः टोकियो स्टेशनवर प्रयोग केला...पण तो यशस्वी झाला नाही

जपानमध्ये हा प्रयोग मोठ्या प्रमाणात यशस्वी झाला नाही. खरं तर, येथे सरासरी ६० किलो वजनाची व्यक्ती एका सेकंदात दोन पावले टाकून फक्त ०.१ वॅट वीज निर्माण करू शकली. या प्रमाणात, टाइल्सची देखभाल देखील महाग होती. म्हणूनच ते मोठ्या प्रमाणावर अंमलात आणले गेले नाही.

**काँक्रीटच्या उष्णतेपासून वीज निर्मिती**

शहरांना काँक्रीटचे जंगल म्हणतात. जेव्हा काँक्रीटच्या इमारती गरम होतात तेव्हा त्याही उष्णता वातावरणात सोडतात. यामुळे केवळ सभोवतालची उष्णता वाढत नाही तर जागतिक तापमानवाढ देखील वाढते. आता या उष्णतेपासून वीज निर्मिती करण्याची तयारी सुरू आहे.

२०२४ मध्ये, जपानमधील क्यूशू विद्यापीठातील संशोधकांनी एक सेंद्रिय टीईजी तयार केला जो खोलीच्या तापमानाला वीज निर्माण करतो. हे उपकरण उष्णता आणि ध्वनी कंपनांचा वापर करते. १७१ मीटरचा टीईजी पॅनेल १०-२० वॅट्स वीज निर्माण करू शकतो. सध्या हा प्रयोग प्रयोगशाळेच्या टप्प्यात आहे.

**भिंतींवरचा रंग वीज निर्माण करणार**

आजकाल अनेक घरांच्या छतावर सौर पॅनेल दिसतात. पण जर घराबाहेरील भिंतींवरचा रंग वीज निर्माण करणारे यंत्र बनला तर? ऑस्ट्रेलियाच्या आरएमआयटी विद्यापीठातील एका संशोधन पथकाने २०१७ मध्ये एक सौर रंग तयार केला. हा रंग सर्वप्रथम हवेतील आर्द्रता शोषून घेतो. नंतर सौरऊर्जेच्या मदतीने ते हायड्रोजन आणि ऑक्सिजनमध्ये मोडते. शेवटी या हायड्रोजनचा वापर वीज निर्मितीसाठी केला जातो. त्याची किंमत सौर पॅनेलपेक्षा ४०% कमी आहे.

**सांडपाण्यापासून वीज निर्मिती**


भारतात दरवर्षी ७० अब्ज लिटर सांडपाणी तयार होते. आता हे घाणेरडे पाणी आणि कचरा विजेचा खजिना बनू शकतो. काही संशोधक सूक्ष्मजीव इंधन पेशीच्या तंत्रज्ञानाचा वापर करून सांडपाण्यापासून वीज निर्मिती करण्याचा प्रयत्न करत आहेत.

सूक्ष्मजीव इंधन पेशी ही एक तंत्रज्ञान आहे जी जीवाणूंसारख्या सूक्ष्मजंतूंच्या मदतीने सेंद्रिय कचऱ्यापासून (उदा. खत, सांडपाणी) वीज निर्मिती करते. एक एमएफसी युनिट १ लिटर सांडपाण्यापासून ०.३-०.५ वॅट वीज निर्माण करू शकते. ते पाणी स्वच्छ करते, ज्यामुळे रासायनिक ऑक्सिजनची मागणी ७०-९०% कमी होते. अमेरिकेच्या पेन स्टेट युनिव्हर्सिटीमधील प्रोफेसर ब्रूस लोगन यांच्या लोगान लॅबमध्ये २००४ पासून एमएफसीवर काम केले जात आहे. येथे ते २६ मेगावॅट/चौ.मी. या वेगाने सांडपाण्यापासून वीज निर्माण करू शकतात.

तंत्रज्ञानाने प्रगत काही देशांमध्ये हे असे नवनवीन प्रयोग करून भविष्यात विज निर्मितीचे प्रयोग सुरू आहेत आणि त्यांना यशही येणार आहे.

■ ■ ■

# जागतिक पुस्तक दिन



आज २३ एप्रिल, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक पुस्तक दिन म्हणून साजरा केला जातो. विल्यम शेक्सपिअर, मिग्युअल सर्वांटीस, इंका गासीलोसो या जगातील ख्यातनाम व्यक्तींचा या दिवशी मृत्यू झाला त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी युनेस्कोने २३ एप्रिल हा दिवस जागतिक पुस्तक दिन म्हणून घोषित केला.

हा दिवस पहिल्यांदा २३ एप्रिल १९२३ रोजी स्पेनमधील पुस्तक विक्रेत्यांनी साजरा केला. स्पेनमध्ये मिगेल डे सर्वांटीसच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा करण्यात आला. त्यानंतर १९९५ मध्ये पॅरिसमध्ये युनिस्कोची सर्वसाधारण सभा झाली ज्यात जगभरातील लेखकांना आदर आणि श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि पुस्तकांमध्ये रस निर्माण करण्यासाठी जागतिक पुस्तक दिन प्रत्येक वर्षी साजरा केला जाईल असा निर्णय घेण्यात आला.

वाचन संस्कृतीच्या चर्चेविना पुस्तक दिन साजरा होऊच शकत नाही. आजच्या मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या युगात पुस्तके वाचण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी कमी होत आहे.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एका जागेवरून हलत नाही. आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरत चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे.

वाचन संस्कृती टिकवण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी पुस्तक दिनासारख्या उपक्रमांचे आयोजन व्हायला हवे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो.

ज्ञान मिळवण्याचे प्रभावी साधन म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्यावर आपली ग्रहण क्षमता आणि स्मरणशक्ती अधिकाधीक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधीक प्रगल्भ होते त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर आणि चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात, त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते.

वाचनामुळे आपले व्यक्तिमत्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे. मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन कायमचा बदलून जातो.

पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या तरुणांना खूप ताण असतो हा ताण कमी करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे वाचन.


डॉ बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणत पुस्तकाने अशक्त मस्तक सशक्त होते आणि सशक्त मस्तक कोणासमोरही डोळे झाकून नतमस्तक होत नसते. स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंग यासारख्या महापुरुषांच्या जीवनाला वाचनामुळेच कलाटणी मिळाली. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा कादंबरी यामुळे वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो.

काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्र वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो. त्यांच्यात नैतिक मूल्यांची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातून नैतिक मूल्ये हरवत चालली आहे. त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे.

आपल्या आणि समाजाच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवे, त्यासाठी पुस्तक दिनासारखे उपक्रम नक्कीच फायदेशीर ठरतील.

■ ■ ■

# समाजाचं वास्तव आत्मभान असणारी कथा : 'दौलत'




साहित्याचा केंद्रबिंदू माणूस आणि त्याचे जीवन असते. त्याच्यासाठीच साहित्य संस्कृती, समाज, भाषा आणि इतरही घटक महत्त्वाचे असतात.साहित्य हे समाजाचे अपत्य असते.त्या काळाचे प्रतिनिधित्व साहित्य करते.

डॉ भालचंद्र नेमाडे यांनी 'कथेला चिंचोळा वाङ्.मय प्रकार म्हटले आहे. 'कथा वाचकाला अस्वस्थ आणि अंतर्मुख करते. वाचकांच्या भावनेला आव्हान करते. वाचकाला विचार करण्यास प्रवृत करते. मनाला अस्वस्थ करते. समाजातील समस्या, प्रश्न, मानवीवृत्ती प्रवृत्तीची परिणामकारकता कथेत असते.समाज परिवर्तनशील असतो. तसे साहित्यिकांनी या बदलांकडे डोळस, तितक्याच सहानुभूतीने पहावयाला हवे. जुन्या पण चांगल्यारिती, प्रथा, व्यक्ती, त्यांचे कार्य आणि शौर्य नवीन पिढीला प्रेरणादायी असतात. वर्तमानातही अशा व्यक्ती समाजाला प्रेरणादायी असतात.

गरीबी, दारिद्रय उपासमार, अन्याय अत्याचार शोषण या मानवनिर्मित आणि निसर्गनिर्मित संकटावर मात करुन श्रम, कष्ट, जिद्द, चिकाटी, निष्ठेवर विश्वास ठेवून आयुष्यात यशस्वी झालेल्या व्यक्तीचे चित्र, चरित्र परिणामकारक मांडून कथा लिहिणे हे कसदार कथालेखकाचे काम असते. हीच भूमिका घेऊन कथालेखन करणारे संवेदनशील, प्रतिभावान कवी, चिंतनशील लेखक, जाणकार समीक्षक म्हणजे डी. बी.जगत्पुरिया हे होतं. त्यांच्या कथा बुद्ध, फुले शाहू आंबेडकरांच्या प्रेरणेने जन्माला आल्या आहेत. या कथा पुरोगामी विचार समाजात रूजविण्याचा प्रयत्न करतात. डी. बी.जगत्पुरिया यांच्या 'दौलत' कथासंग्रहातील सर्वच कथा मानवी जीवनातील वेगवेगळ्या विषयाला स्पर्श करताना पहावयास मिळतात.

या संग्रहातील पहिलीच कथा 'आखाडा' ही होय. ही कथा विचार, संस्कार, नीती आणि अन्यायाचा प्रतिकार करणारी मानवतावादी प्रज्ञावंत माणसाची कथा आहे. 'झिंगरा' हा या कथेचा नायक सासरवाडीत राहून शेळीपालन करतो. त्याला बकरी चारायचं काम करावं लागलं.त्यामुळे त्याची 'हर्र्रर्र...हाप' ची स्टाईल गावाकरांना परिचित होती. झिंगऱ्यांला पाहिलं की,गावातले पोट्टे 'पाव्हनं हर्र्रर्र.. हाप म्हणायचे.झिंगऱ्या पाव्हनाही न चिडता हर्र्रर्र...चाप म्हणून प्रतिसाद द्यायचा ही खेळकरवृती त्याच्या ठिकाणी होती. आपण पाव्हणं आहोत ही जाणीव ही त्याला होती. गावातील उध्दट पोरं झिंगऱ्याला 'बकरक्या म्हणून चिडवयाचे तेव्हा मोलमजुरी करून त्याच्याशी संसार करणारी त्याची पत्नी काशी म्हणायची, मेल्यानो, मपला धनी गरीब आहे. कुणाच्या आध्यात नाही मध्यात, कुणाच्या देण्यात नाही घेण्यात नाही.बकरी चारणारा माणूस नसतो काय? तुमी कोन कलेक्टर लागून केलात रे? गरीबांना इभ्रतीने जगू द्या. खबरदार? तुम्ही त्याचं नाव घेतलं तर म्या वाघीन हाय वाघीन! आलं का टकुऱ्यात? बोलीभाषेतील जीवंत संवादामुळे या कथेला टोकदारपणा आला आहे.

पुढे त्यांना मुलगा होतो. मुलाचे नाव गबरू ठेवतात. त्याला शाळेत घालतात परंतु त्याला शिक्षणापेक्षा कुस्ती खेळण्याचा छंद असतो.त्यासाठी दोघेही आईवडील त्याला प्रोत्साहन देतात. अतिशय कष्टाने जीवन जगणारी माणसं प्रामाणिक असतात तसेच ते वेळप्रसंगी अन्यायाविरुद्ध बंडही करतात याची जाणीव ही कथा करून देते. गबरू अनेक आखाडे गाजवतो. कायम अपराजित विरोबा पैलवानाला गबरू चित करतो. नंतर त्याला सहकारी बँकेच्या मुख्य शाखेत मॅनेजर म्हणून नियुक्ती मिळते. गबरुच्या विजयामुळे त्याची गावात मिरवणूक काढली जाते. घरोघरी औक्षण केले जाते.

गावाचा रायभान पाटील शंभर रुपये ओवाळणी देऊन गबरुला छातीशी लावतो. मिरवणूकीत झिंगरा आणि काशीही होते. तो गावाच्या विजयाचा सण होता. गावाची प्रतिष्ठा, स्वाभिमान,अभिमान आणि गौरव होता. लेखकांनी या कथेमधून जे जमतंय ते चांगलं करा. निष्ठा ठेवून काम केल्यास निश्चितच जीवनात यश मिळते. कामाला प्रतिष्ठा आपणच मिळवून दिली पाहिजे. बकरे चारणाराही माणूसच असतो याची जाणीव करून देणारी ही कथा लेखकांनी अतिशय ताकदीने लिहिली आहे.

कर्मयोगी बाबाजी ही व्यक्तीचित्रणात्मक कथा आहे. गरीबी दारिद्रयावर मात करून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने मिलिंद महाविद्यालय, औरंगाबाद येथून पदवीचे शिक्षण पूर्ण करून शिक्षकांची नोकरी करतो. नंतर सरकारी नोकरी पाटबंधारे खात्यात मिळते अतिशय निष्ठेने, प्रामाणिकपणे नोकरी करून पशू पक्ष्यांना अन्न खाऊ घालतो. बाबाजी हा अद्वैतवादी, संवेदनशील नीतीमत्तेने जीवन जगणारा डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांने प्रभावित झालेला नायक आहे. बाबाजीची दोन्ही मुले उद्योगशील आहेत. मुलगी सुरेखा सासरच्या जाचाला कंटाळून नवऱ्याचा त्याग करते. ती नर्सची नोकरी करते. ती सुसंस्कृत सभ्य असून बाबाजीने तिला दिलासा दिला. बाबाजीचं जीवन म्हणजे एखाद्या निर्मळ पुस्तकासारखे आहे. कसलाच अभिनिवेश नसलेल्या बाबाजीची व्यक्तिरेखा अतिशय आदर्शवादी आहे ती लेखकांनी अतिशय उठावदारपणे उभी केली आहे.

'भैय्यासाहेब' ही व्यक्तिचित्रणात्मक कथा आहे. या कथेचा नायक भैय्यासाहेब पुरोगामी विचाराचा विज्ञानवादी आहे. अन्यायाविरुद्ध बंड करणारा सर्वांना आपलंसं वाटणारा भैय्यासाहेब समाजसेवक आहे. मराठवाडा मुक्तीसंग्राममध्ये स्वातंत्र्यसैनिक म्हणून कार्य केले परंतु त्यांनी पेन्शन घेतली नाही. आपण देशासाठी काम केले पैशासाठी नाही इतके देशप्रेम भैय्यासाहेबांच्या ठिकाणी होते. सावत्र आईचे ऐकून वडीलांनी घरच्या बाहेर काढलं तसं दुसऱ्या गावात जाऊन किरणा दुकान टाकून परिश्रम करून आत्मविश्वासाने जीवन जगणारा भैय्यासाहेब श्रेष्ठ व्यक्ती आहे. आत्महत्या करण्यास तयार झालेल्या भावाला गावात आणून त्याचे कुटुंब उभा करणारा, स्वाभीमानी, प्रेरणादायी भैय्यासाहेबांची स्वच्छ व निर्मळ व्यक्तीरेखा अतिशय तरलपणे उभी करण्यात लेखक यशस्वी झाले आहेत.शेवटी भैय्यासाहेब आजाराने मृत्यू पावले तेव्हा अनेक लोकांनी हळहळ व्यक्त केली.जो लोकांवर प्रेम करतो,त्यांच्यावरही लोक जीवापाड प्रेम करतात याची जाणीव करून देणारी कथा म्हणजे 'भैय्यासाहेब' ही होय.

---------(क्रमशः)---------

**डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे**
**उदगीर. ९९२२९६६५२६**

■ ■ ■

# इंग्रजी शाळेची क्रेझ, गुणवत्ता आणि भविष्य

**उत्तरार्ध**

आज स्वतःला जागतिक पातळीवर सिद्ध करायचे असेल तर इंग्रजी आवश्यक आहेच. आज अनेक नोकऱ्या देखील इंग्लिश बोलण्यावरच आहेत. परंतु फक्त इंग्लिश बोलण्यासाठी बालवाडीपासुन ते पदवी पर्यंत लाखों रुपए खर्च करण्याची काहीच गरज नाही.

बरं एवढा खर्च करूनही जे इंग्लिश शाळेत जातात त्यांना किती इंग्लिश येते हे तपासून बघितलं तर गुणवत्ता ढासाळत चालली आहे हे दिसून येते. व्हाट इज युवर नेम? वाट इज युवर फादर नेम? व्हाट इज युवर फुल नेम? हे तर मराठी शाळेतील पहिली दुसरीची विद्यार्थी बोलू शकतात. मग इंग्रजी शाळेत जाऊन नेमकं काय शिकले याचे उत्तर शोधणे गरजेचे आहे. कारण आज याचे उत्तर नाही शोधले तर या मुलांचे भविष्य अंधकारमय होणार आहे.

लाखों रुपये खर्च करून इंग्लिश जर बोलता आले नाही, आपण शिकलेले इंग्लिश मध्ये मांडता आले नाही तर नोकरी कुठे लागणार? शासकीय नोकरी कमी झाल्या आहेत पण शासकीय नोकरी साठी इंग्लिश माध्यमाची सक्ती नाही. खाजगी कंपन्या मध्ये रोजगार संधी आहे तर ते इंग्लिश बोलता आले तरच नोकरी देतात. आणि इंग्लिश माध्यमातून शिकले म्हणल्यावर इंग्लिश तर यायलाच पाहिजे. जर इंग्रजी येत नसेल मराठी जमत नसेल तर अशांना रोजगार कोण देईल?

बरं रोजगार मिळवण्यासाठी इंग्लिश बोलता यायला पाहिजे तर बालवाडीपासुन इंग्रजी चा आग्रह का? कोणत्याही चांगल्या इंग्लिश टिचर कडून चार पाच महिन्यात चांगली इंग्लिश बोलणे शिकता येते तेही प्रत्येकाला परवडेल अशा किंमतीत. मग फक्त दरवर्षी निरर्थक खर्च कशासाठी? बरं एवढा खर्च करूनही नोकरी किंवा रोजगाराची शंभर टक्के शाश्वती आहे का? खर्च करूनही शाश्वती नसेल तर महाग शिक्षण कशाला मग?

खाजगी महाग शिक्षणावरचा खर्च टाळून सरकारने शिक्षण द्यावे यासाठी आग्रह धरला आणि पदवी पर्यंत चे खाजगी शिक्षणावरील पैसे बचत केले तर समजा शिकून नोकरी नाहीच लागली तर बचत झालेल्या पैशात छोटा मोठा उद्योग सुरू करून उपजिवीकेचे साधन उपलब्ध करून घेता येईल. परंतु संपूर्ण बचत खाजगी शिक्षणावरच खर्च केली आणि शिक्षण पुर्ण झाल्यावर नोकरी नाहीच मिळाली तर भविष्य मात्र अंधारात जाईल आणि याला जबाबदार कोण राहील याचा विचार व्हावा.

म्हणून केवळ रोजगार पाहिजे म्हणून इंग्लिश बोलता यायला पाहिजे असल्यास इंग्लिश स्पोकन कोर्स करूनही इंग्लिश बोलता येते. ज्यांची मुलं खरचं सातवी पर्यंत आहेत किंवा लहान मुल आहेत ज्यांना शाळेत टाकायचे आहे अशा मुलांच्या आई वडिलांपैकी एकाने जरी इंग्लिश बोलणे शिकले तर मुलाचे भविष्य उज्वल होईल. कारण इंग्लिश घरातच असल्याने त्याला बोलायला जास्त मेहनत घेण्याची गरज नाही. इंग्लिश बोलायला शिकणे काही अवघड गोष्ट नाही. प्रत्येक विद्यार्थी पालक यांनी विचार करूनच आपल्या खर्चाचे नियोजन करून बचत करावी. आजची बचत उद्याची कमाई असते.

खाजगी शाळेला खुप मोठी रक्कम देऊन श्रीमंत केल्यापेक्षा तोच पैसा बचत करून लेकराच्या भविष्यासाठी ठेवला तर खुप मोठा आधार होईल. म्हणून मोठेपणा न करता वास्तव समजून शिक्षणाला महत्व द्यायला पाहिजे. फक्त उधळपट्टी म्हणजे शिक्षण मुळीच नाही. प्रत्येकाने इंग्लिश शिकणे काळाची गरज आहे. त्यासाठी इंग्लिश स्पोकन कोर्स चा आधार घेणे हाच सर्वोत्तम उपाय आहे.

-----------------

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव, ता. मेहकर**
**९१३०९७९३००**

■ ■ ■

## एका मिनिटाचा आदेश

**वाचक लिहितात**

निर्णय घ्यायला आणि आदेश द्यायला एक मिनटही पुरेसा आहे. धर्माधिष्ठित राज्यात धर्मातील नैतिक मूल्ये शिक्षणातून सांगितली गेल्यामुळे राष्ट्रातील नागरीक, राज्यकर्ते, न्यायपालिका, आणि पोलीस-सैन्य ह्या नागरिकांच्या सुरक्षा यंत्रणांना धर्माच्या बाजूने म्हणजेच नैतिकतेच्या बाजूने तत्काल निर्णय देणे शक्य झाले असते.

आपल्या धार्मिक कर्तव्याची तर दूर पण नैतिक कर्तव्यांच्यासाठीही ठोस भूमिका घेण्यासाठी झगडावे लागत असेल तर आजपर्यंत आपले धर्मग्रंथ, ऋषीमुनी, संत, हिंदुत्वनिष्ठ विचारवंत यांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या राज्यकर्त्यांची हिंदूंच्या संरक्षणाची हमी देता येत नसेल तर आपल्या वयाची इतकी तपश्चर्या ज्यासाठी झाली किंवा होत आहे ते व्यर्थ गेले, असे आपले पूर्वज म्हणतील.

केंद्र शासनाने बंगाल मधील सातत्याने होणाऱ्या हिंदू नरसंहारावर, पलायनावर तेथे तत्काळ राष्ट्रपती राजवट आणायला हवी. बंगालच्या मुख्यमंत्र्यांची राजकीय सभागृह किंवा सभागृहाबाहेरील चिथावणीखोर भाषणांसाठी त्यांना राजदंड म्हणून सैन्याने अटक करावी. सैन्याला पिडीत हिंदूंच्या रक्षणासाठी आणि जिहादी, दहशतवादी नागरीकांच्या संहारासाठी तत्काळ पाचारण करावे. ही धमक प्रखर राष्ट्रनिष्ठा आणि धर्मनिष्ठेमुळेच येऊ शकते. आपली भूमिका स्पष्ट असेल तर कुठलेही नरेटीव्ह आड येत नाही. निर्णय एका मिनिटाच्या आत देता येतो.

■ **भूषण प्रदीप वाळणुसकर, डोंबिवली.**



# उन्हाळ्यात चक्कर येतो? रिकाम्या पोटी प्या हे खास पेय

जेव्हा तापमान वाढू लागते तेव्हा शरीराची ऊर्जा आपोआप कमी होऊ लागते. अशावेळेस आपले शरीर केवळ डिहायड्रेशनचे बळी पडत नाही तर पोषणाची कमतरता देखील जाणवू लागते. उन्हाळ्यात उष्णता वाढल्याने अशा समस्यांना तोंड द्यावे लागू नये म्हणून, आले आणि हळदीपासून बनवलेल्या एका खास पेयाबद्दल ही माहिती.

ते प्यायल्यानंतर उत्साही वाटेल आणि रोगप्रतिकारक शक्ती देखील मजबूत होईल. हे पेय शरीराला आतून डिटॉक्स करते. आले आणि हळदीपासून बनवलेले पेय केवळ रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करत नाही तर शरीरातील जळजळ देखील कमी करते. त्यामुळे पचनक्रिया देखील सुधारते.

**रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते**

उन्हाळा केवळ उष्णता वाढवत नाही तर अनेक प्रकारचे संसर्ग आणि हंगामी फ्लू देखील घेऊन येतो. हळदीमध्ये असलेले करक्यूमिन शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. तर आले ऑक्सिडेटिव्ह ताणाशी लढण्यास मदत करते. हे नैसर्गिक पेय एका विशेष प्रकारच्या रोगप्रतिकारक शक्तीचे बूस्टर म्हणून काम करते जे शरीराला संसर्गाशी लढण्यास मदत करते.

**मजबूत पचनसंस्था**

उन्हाळ्यात अनेकदा जास्त खाल्ल्याने पचनाच्या समस्या उद्भवतात. आले खाल्ल्याने लाळ, पित्त आणि जठरासंबंधी एंजाइमची पातळी वाढते. ज्यामुळे पचनाच्या समस्या वाढू लागतात. हळद आतड्यांमधील जळजळ कमी करते आणि ते निरोगी बनवते.

**नैसर्गिक डिटॉक्सिफायर**

उन्हाळ्याचा दिवसांमध्ये अनेकवेळा थकवा जाणवतो आणि शरीरात घाण साचू लागते. जर शरीर आतून डिटॉक्स करायचे असेल, तर तुम्ही हळद आणि आले असलेले हे खास पेय प्यावे. हे पेय यकृताचे कार्य मजबूत करते.

हे एक नैसर्गिक पेय आहे जे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्याची प्रक्रिया वेगवान करते. यामध्ये आढळणारे अँटिऑक्सिडंट गुणधर्म रक्त शुद्ध करण्यास मदत करतात.

**दाहक-विरोधी औषधांचे पॉवरहाऊस**

उन्हाळ्यात अनेक लोकांच्या सांध्यातील वेदना खूप वाढतात. यासाठी आले आणि हळदीयुक्त हे पेय प्यायल्याने यामध्ये आढळणारे दाहक-विरोधी गुणधर्म सनबर्न आणि सांधेदुखीवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण ठेवतात.

**चमकदार त्वचेसाठी फायदेशीर**

शरीरात पाण्याची कमतरता टाळण्यासाठी, तुम्ही दररोज रिकाम्या पोटी आले आणि हळदीपासून बनवलेले हे पेय प्यावे. त्यात दाहक-विरोधी आणि अँटिऑक्सिडंट गुणधर्म आहेत. ज्यामुळे केवळ मुरुमे कमी होतातच असे नाही तर सूज कमी होते आणि त्वचा चमकदार होते.

■ ■ ■

**अशोकायन**



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

## नख गळती

केसगळती मागोमाग
नख गळतीने
समाजमन झाले भयभित
निदान व्हावे लवकर
हेच जनतेला अपेक्षीत . .

शरीरातील टॉक्सीन
बाहेर पडल्यावर
नखे येतील पुर्ववत
वैद्यकीय अधिकाऱ्यांनी
व्यक्त केलेय मनोगत ..!

तज्ञांच्या आल्या चमू
घेऊन गेले नमुने
कारणे व उपाय मात्र
अद्यापही गुलदस्त्याच
आहे म्हणे..!









Snapdragon 6 Gen 4





## आज का अंदाज

बुधवार २३ एप्रिल २०२५

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ७ | ८ | २ | ५ | ६ | ७ |
| ११९ | १६७ | ११५ | ४४० | ६७९ | २३० | १७८ | १३३ |
| ३९९ | ३४७ | ४४९ | २७९ | ४९९ | ३५७ | ३५८ | २५० |
| ४७० | ६८० | ८९० | १२५ | ३३६ | १२२ | २७७ | ४५८ |
| १० | ४० | ७३ | ८३ | २० | ५० | ६८ | ७८ |
| १२ | ४२ | ७५ | ८५ | २१ | ५१ | ६४ | ७४ |
| १६ | ४६ | ७९ | ८९ | २९ | ५९ | ६३ | ७३ |


२३ एप्रिल : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ६० | ९० |
| २३ | ३२ | ६४ | ९४ |
| २७ | ३८ | ६७ | ९७ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## शब्दकोडे क्रमांक २०९३




**आडवे शब्द :-**
१) मातापिता
५) **** *** राजाराम, पतित पावन सीताराम
१०) मध्यस्थ
११) सूर्य
१२) चांदी
१३) कातडी
१४) मंडपाच्या किंवा छताच्या शिखराचा मध्यभाग
१७) इंद्र
१८) उपयोग
२०) नूतन
२२) असुर
२४) एक छोटे चर्मवाद्य
२७) लायसेन्स (म.)
२९) उद्याच्या नंतरचा दिवस
३१) भय, भीती, शंका
३३) किंमत
३४) लोणच्यातील द्रवमसाला
३५) झोपेचे खोबरे, जागे राहाणे
३६) सतत भटकणारा
३९) सोने
४१) मोड्डी गंमत
४३) चंद्र
४५) पिकांचा एक हंगाम
४७) ओझी वाहणारा
४८) मूर्ती तयार करणारा
५०) फकीर, भिक्षेकरी, मदारी
५२) चाल सभ्यपणाची रीत
५५) कर्ज देणारा
५६) गुणाकार
५७) जाणे
५९) अर्धी ओंजळ
६१) पक्का चोर, गुन्हेगार, वस्ताद,
६२) विधवा
६४) पृथ्वी
६६) व्यायाम
६८) निबिड अरण्य
६९) माळ, हार
७०) रम्य
७३) अस्ताव्यस्त पडलेले सामान
७५) समाधान होणे (वा.प्र.)
७७) सततची हालचाल
७८) वजन,
७९) रक्षण करणारा

**उभे शब्द :-**
१) जहाज, नौका इ सागरी वाहन
२) नूतन
३) पाऊल (हिं.)
४) आश्चर्य
५) रविवार
६) दुर्दशा
७) तृतीया
८) रात्रीचा पाऊस
९) सरपण, कोळशाचे दुकान
१५) दार
१६) सगळा, जमिनीवरील कर
१९) पंख
२१) उपयोग
२३) जैन साधू
२५) भिंतीतील कपाट
२६) चलनवलन
२८) नाचणी
३०) यात्रेला नियमित जाणारा
३२) फणसातील खाद्यभाग
३४) जनगणना
३७) मधमाशी
३८) **** करके हमे यूं न जाईये, आपको हमारी कसम लौट आइये' एक हिंदी चित्रपट गीत
४०) अर्भकाचा गळा दाबून खून करणे (वा.प्र.)
४२) सामान
४४) थोडे, लव
४६) काकुळतेने आर्जव करणे (वा.प्र.)
४७) बंगला, मोठा वाडा
४८) एक रंगीत लाकूड
४९) कशा प्रकारचा
५१) पडदा
५३) तो पर्यंत
५४) गतिमान
५६) राजाची अत्यंत आवडती राणी
५८) नरसिंह
६०) तात्पर्य
६२) अदृष्य
६३) मोठी आग, चिता
६५) लहान
६६) वाळवी
६७) पोत्याचे कापड
७१) सापाची एक जात
७२) गाण्यातील एक शब्दालंकार
७४) प्रामाणिक
७५) ओटा, कट्टा
७६) हिन्दीत पुन्हा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# नाशिक परिसरातील रिंगरोडचा प्रस्ताव तातडीने मंत्रिमंडळासमोर सादर करा : फडणवीस

*** नाशिक ई-बस एकात्मिक सुविधेचा प्रस्तावही तयार करा**
*** रिंगरोड प्रकल्पातील रस्तेकामांचा आराखडा दहा दिवसांत पाठवा**

**नाशिक ।** कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिक परिसरात वाढणारी रहदारी, साधू-संत-महंत आणि भाविकांची होणारी गर्दी यांचा विचार करुन योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर नाशिक बाह्यवळण प्रकल्पाचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी तातडीने सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच नाशिक शहरात येणाऱ्या भाविकांना उत्तमोत्तम वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ई-बस एकात्मिक सुविधेचा प्रस्तावही तयार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

नाशिक बाह्यवळण रस्त्याच्या कामांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात आढावा घेतला. या बैठकीस जलसंपदा मंत्री गिरीश महाजन उपस्थित होते. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर बाह्यवळण रस्त्यांतर्गत (रिंग रोड) येणाऱ्या मार्गांची कामे प्राधान्याने हाती घेण्याचे निर्देश देऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नाशिक विभागीय आयुक्त आणि नाशिकचे पालक सचिव यांनी प्राधान्याने सुरु करावयाच्या रस्त्यांचा आराखडा येत्या १० दिवसांत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर करावा. बाह्यवळण मार्ग, परिक्रमा मार्ग



यांच्याबरोबरच अस्तित्वातील रस्त्यांच्या रुंदीकरणाची कामे तातडीने सुरु करावीत. विमानतळ, समृद्धी महामार्ग यांना जोडणाऱ्या मार्गांची कामे युद्धपातळीवर सुरु करा. तसेच शहरातील आवश्यक रस्त्यांची कामे देखील महापालिकेमार्फत नगर नियोजन अंतर्गत घेण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक येथे मुंबई, जव्हार, गुजरात, छत्रपती संभाजीनगर, शिर्डी, धुळे, पुणे, मुंबई अशा मार्गाने भाविक येण्याची शक्यता आहे. त्या मार्गातील रस्त्यांचे बळकटीकरण करण्यासह त्या रस्त्यांवर वाहनतळांची सुविधा निर्माण करावी. नाशिक शहरात येणाऱ्या भाविकांना उत्तमोत्तम वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ई-बस एकात्मिक सुविधेचा प्रस्ताव तयार करा. नाशिकमधील रहदारीचे योग्य नियोजन करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करा, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले. देशातील शहरांना विकास केंद्र म्हणून प्रस्थापित करण्यासाठी शहरांचा सर्जनशील पुनर्विकास, शहरांच्या पाणी पुरवठा आणि स्वच्छतेच्या प्रस्तावांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने 'शहरी आव्हान निधी' स्थापन केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या 'शहरी आव्हान निधी' कार्यक्रमांतर्गत नाशिक शहरातील वाहतूक समस्येचा समावेश करून नागरिकांचा प्रवास सुखकर करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

नाशिक बाह्यवळण मार्गातील १३७ किलोमीटरचे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ग्रीनफील्ड अलाईनमेंटद्वारे उभारण्यात येणार आहेत. जुन्या नाशिक-मुंबई महामार्गापासून पुढील ६९ किलोमीटरचा मार्ग हा 'महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा'मार्फत बांधण्यात येणार आहे. यातील ४१ किलोमीटरचे रस्ते महापालिका हद्दीबाहेरून जातात. या रस्त्यांसाठी ४० गावांमधील ५०० हेक्टरचे भूसंपादन करावे लागणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. या बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले आदी उपस्थित होते.

## ➤ महत्त्वाचे

### पसंतीच्या क्रमांकासाठी दिले सात लाख रुपये

**नाशिक ।** हौशीला मोल नसते असे म्हटले जाते. हौशीसाठी एखादा व्यक्ती हवे ते दाम मोजण्यास तयार असतो. एका वाहनचालकाने पसंतीचा क्रमांक मिळावा यासाठी आरटीओकडे तब्बल सात लाख रुपये भरले. चार चाकी वाहनांसाठी नवीन एमएच १५ केजी ही मालिका सुरू झाली आहे. या मालिकेतील १४ आकर्षक नंबरसाठी लिलाव प्रक्रिया सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी विलास चौधरी यांच्या उपस्थितीत पार पडली. यात नऊ क्रमांकासाठी सर्वाधिक बोली लागल्याने एका हौशी वाहनचालकाने तब्बल ४ लाख ५० हजार रुपयांची अधिकची बोली लावून शासकीय शुल्कासह ७ लाख रुपयांना खरेदी केले. दरम्यान, एकाच दिवसात किंवा लिलावाच्या माध्यमातून परिवहन विभागाला ८ लाख २२ हजार ३३२ रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळाला.

### गोविंदपुरी गाव झाले टँकरमुक्त!

**नाशिक ।** जल जीवन मिशन योजनेअंतर्गत गंगामाळुंगी ग्राम पंचायती अंतर्गत गोविंद पुरी (तालुका नाशिक) गावातील पाणीटंचाईचा प्रश्न पूर्णपणे मिटला आहे. गेल्या सात वर्षांपासून या गावात पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून रहावे लागत होते. एप्रिलपासून या गावांमध्ये नळाद्वारे नियमित पाणीपुरवठा सुरू झाल्याने गाव टँकरमुक्त झाले आहे. गटविकास अधिकारी डॉ. सोनिया नाकाडे यांनी 15 व्या वित्त आयोगातून ट्रांसफार्मर बसविले. उपकार्यकारी अभियंता विनोद देसले यांनी योजना पूर्ण करण्यासाठी सर्व यंत्रणांशी समन्वय साधला. सरपंच भारतीय खोडे ग्रामपंचायत अधिकारी गंगाराम गायकवाड आदींनी परिश्रम घेतले. गावकऱ्यांची साथ, ग्रामपंचायत सदस्यांची सर्वांची मनापासून साथ मिळाल्याने हे साध्य होऊ शकल. आज घडीला गोविंद पुरेगाव पूर्णपणे टँकर मुक्त झाले असून, नागरिकांचा प्रश्न मिटला आहे.

### जिल्ह्यात ८०९ गावांत सरपंच आरक्षण घोषित

**नाशिक ।** जिल्ह्यातील बिगर अनुसूचित्र क्षेत्राबाहेरील ८०९ ग्रामपंचायतींमध्ये



सोमवारी (दिनांक २१) सरपंच आरक्षण सोडतीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या प्रक्रिया दरम्यान काही गावांमध्ये जागा राखीव झाल्या असून, काही ठिकाणी खुल्या प्रवर्गाच्या जागांवर आरक्षण पडले. त्यामुळे गावांमध्ये कही खुशी कही गम असे चित्र पाहायला मिळत आहे. राज्य शासनाच्या मार्गदर्शनानुसार जिल्ह्यातील बिगर अनुसूचित्र क्षेत्रा बाहेरील ग्रामपंचायतमध्ये सरपंच आरक्षण सोडतीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. जिल्ह्यातील १५ तालुक्यातील एकूण ८०९ ग्रामपंचायत साठीही सोडत प्रक्रिया पार पडली. त्यासाठी सर्वच तहसील कार्यालयांमध्ये एकाच वेळी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक घेण्यात आली. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग तसेच खुल्या प्रवर्गासाठी आरक्षण करण्यात आले. काही गावांमध्ये बदल झाले असून, काही गावांमध्ये आरक्षण करण्यात आले आहेत. सरपंचपद पुढील पाच वर्षासाठी राखीव झाले. त्यामुळे विद्यमान सरपंचांना धक्का बसला आहे. काही गावांमधील जागा खुल्या प्रवर्गासाठी सुटल्याने इच्छुक, कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयाच्या आवारात आनंद उत्सव साजरा केला. सरपंचाचे आरक्षण पुढीलप्रमाणे आहे. अनुसूचित जाती ५४ अनुसूचित जमाती १०७ ओबीसी प्रवर्ग २१८ सर्वसाधारण प्रवर्ग ४३० असे एकूण ८०९ सरपंच पदाचे आरक्षण आहे.

### शहरात २५ तारखेला शांती मार्च काढणार

**नाशिक ।** बिहार येथील बुद्धगया महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे यासाठी शुक्रवारी (दिनांक २५) शांती मार्च काढण्यात येणार आहे, अशी माहिती आयोजकांनी दिली. शांती मार्च दुपारी तीनला नांदुर नाका येथून निघणार आहे. दसक, जेलरोड, बिटको पॉईंट, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या मार्गावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर या ठिकाणी या मार्चचा समारोप होईल. बौद्ध बांधवांस भारतीय बौद्ध महासभा, बौद्ध भिक्खू संघ, समता सैनिक दल, सम्यक विद्यार्थी आंदोलन समिती, परीवर्तन परिवार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंच, त्रिरश्मी बुद्ध लेणी विकास संस्था, मातृभूमी प्रबोधन समिती दिनबंधू वाचनालय व बुद्ध विहार, टागोर नगर, बुद्ध विहार, मानवतावादी बहुउद्देशीय संस्था, संविधान सन्मान समिती, वंचित बहुजन आघाडी, रिपब्लिकन पक्ष पुरोगामी संघटना, बौद्ध महिला मंडळ आदी यामध्ये सहभागी होणार आहेत. या शांती मार्चमध्ये सहभागी होण्याचे आवाहन महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन समितीने केले आहे.

# पावसाळ्यापूर्वी नाल्यांची दुरुस्ती, साफसफाई करावी

**नाशिक ।** शहरातील अनेक भागांमध्ये पावसाळी नाले असून या नाल्यांमध्ये माती, कचरा मोठ्या प्रमाणावर साचलेला आहे. काही नाल्यावरील ढापेही बुजलेले दिसून येतात. अनेक वर्षांपूर्वी बांधण्यात आलेले हे पावसाळी नाले अरुंद असून, नियमित साफसफाई न झाल्याने त्यांची खोली दिवसेंदिवस कमी होत नाले बुजले जात आहे. यामुळे पावसाळ्यात रस्त्यांवर, गल्लोगल्ली मोठ्या प्रमाणावर पाणी वाहताना दिसते.

नवीन सिडको गणेश चौक येथे गेल्या अनेक वर्षांपासून पावसाळ्यात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचत आहे. या पाण्याचा निचारा होत नसल्याने हे पाणी गणेश चौकातील खालील गल्ल्यांकडे वळत असल्याने थेट लोकांच्या घरात घुसते. गणेश चौक व्यापारी संकुल ते त्रिलोकेश्वर मंदिर या ठिकाणचा पावसाळी नाला हा पूर्णपणे कचरा व मातीने भरलेला असून, पावसाळ्यात जमा होणारे पाणी या नाल्यातून पुढे वाहत नसल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचते. व्यवसायिकांच्या दुकानात पाणी शिरते. यामुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असते. या नाल्याची रुंदी व खोली मोठी करून या ठिकाणी नवीन पाईप टाकण्यात यावे व नाल्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून वारंवार केली जात आहे.

## नागरिकांची मनपाकडे मागणी



“ गणेश चौक व्यापारी संकुल- सार्वजनिक मुतारी ते मनपा शाळेची भिंत या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अनेक वर्षांपासून पावसाचे पाणी साचत आहे. येथील पावसाळी नाला हा कमी रुंदी व खोलीचा असून, तो काही प्रमाणात बुजलेला असल्याने पावसाळ्यात या ठिकाणी गुडघ्यापर्यंत पाणी साचत आहे. ही बाब आम्ही मनपा अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. दोन महिन्यावर पावसाळा आला असल्याने केवळ वरचे वर साफसफाई न करता योग्य पद्धतीने कामकाज करून कायमस्वरूपी प्रश्न सुटला पाहिजे अन्यथा आम्ही सर्व नागरिक रस्त्यावर उतरून जनआंदोलन करू.
**- कुणाल धात्रक (सामाजिक कार्यकर्ते)**

“ गेल्या अनेक वर्षांपासून गणेश चौक या भागात रस्त्यावर पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणावर साचते. यावर महापालिकेकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने हे सर्व पाणी खालील गल्लीकडे वाहते. पाण्याचे मोठं मोठे लोंढे येत असल्याने थेट घरात पाणी घुसते. आम्ही अनेक वर्षांपासून या ठिकाणी वास्तव्यास असून दरवर्षी पावसाळ्यात आम्हाला संघर्ष करावा लागत आहे. पाणी घरात घुसत असल्याने दरवर्षी संसार उपयोगी वस्तूंचे नुकसान होऊन आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. **- विजय महाले (स्थानिक रहिवाशी)**

# एकशेवीस विद्यार्थी २०१९ च्या बॅचचे झाले एमबीबीएस

## मविप्रच्या डॉ. पवार वैद्यकीय महाविद्यालयाचा पदवीदान सोहळा



**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाजाच्या आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएस बॅच २०१९ चा पदवीदान समारंभ हॉटेल गेट वे नाशिक येथे संपन्न झाला.

पदवीदान सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे, मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, शिक्षणाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर लोखंडे, अधिष्ठाता डॉ. सुधीर भामरे व विविध विभाग प्रमुखांची उपस्थिती होती. या पदवीदान सोहळ्यामध्ये एकूण १२० विद्यार्थ्यांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची एमबीबीएस ही पदवी प्रदान करण्यात आली. महाविद्यालयातील इंटर्नशिप विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. सुनीता पवार यांनी पाहुण्यांचे स्वागत तर अधिष्ठाता डॉ. सुधीर भामरे यांनी पदवीप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक करत वैद्यकीय व्यवसायाची मूल्ये प्रामाणिकपणे आणि समर्पणाने जपण्याचे आवाहन केले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. चारुदत्त शिंदे यांनी विद्यार्थी आणि पालकांचे अभिनंदन करून पदवी घेऊन बाहेर पडताना रुग्णसेवा देताना करुणा, सचोटीने समाजाची सेवा करण्याचे सांगत शुभेच्छा दिल्या. ॲड. नितीन ठाकरे, बाळासाहेब क्षीरसागर, डॉ. अशोक वनकुंद्रे यांनीही मनोगत व्यक्त करत पदवीधर विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. एमबीबीएस २०१९ बॅचच्या विद्यार्थ्यांना यावेळी प्रमुख पाहुणे आणि विविध विभाग प्रमुखांच्या हस्ते स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र प्रदान करण्यात आली. यावेळी विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रिया कुलकर्णी, प्रा. डॉ. रवींद्र सोनवणे, प्रा. डॉ. मानसी कटाळे, प्रा. डॉ. प्रीती बजाज, प्रा. डॉ. कैलास मोगल, प्रा. डॉ. निलेश चौधरी, प्रा. डॉ. सुरेखा नेमाडे, प्रा. डॉ. जितेंद्र कोडीलकर, प्रा. मिलिंद देशपांडे आदींसह विविध विषयांचे शिक्षक उपस्थित होते. पदवीदान सोहळ्याचे नियोजन कम्युनिटी मेडिसीन विभागाचे प्राध्यापक व प्रमुख डॉ. बालाजी अलमाले, प्रा. डॉ. सुनिता पवार, डॉ. शितल पाटील, डॉ. अक्षदा शिंदे, डॉ. सुधा अय्यर यांनी केले. डॉ. शितल पाटील व डॉ. अक्षदा शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सतीश वाघमारे यांनी आभार मानले. कार्यक्रमास पदवीप्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

# कोकणा कोकणी आदिवासी समाजाची हरसूल येथे बैठक संपन्न



**त्र्यंबकेश्वर ।** कोकणा -कोकणी आदिवासी समाज सेवा संघ ही सामाजिक संघटना महाराष्ट्रात १९९६ पासून कार्यरत असून, या सामाजिक संस्थेचा मेळावा २७ एप्रिल रोजी पालघर मधील जव्हार या ठिकाणी होणार आहे. या मेळाव्याच्या नियोजना निमित्ताने तालुकावार बैठका आयोजित केल्या गेल्या होत्या. त्र्यंबकेश्वर तालुक्यातही या मेळाव्या संबंधित बैठक पाताळेश्वर, हरसूल या ठिकाणी पार पडली.

केंद्रीय कोअर कमिटी सदस्य गीतेश्वर खोटरे, वसंत राऊत यांनी सामाजिक संस्थेची पार्श्वभूमी व इतिहास कथन करून उपस्थित सदस्यांना संस्थेच्या कार्याची माहिती करून दिली. त्यानंतर या बैठकीत सामाजिक समस्या, संस्कृती रक्षण, पर्यावरण रक्षण, शिक्षण संधी, रोजगार, व्यवसाय अशा विषयांवर चर्चा करून काही ठराव संमत करण्यात आले. याप्रसंगी त्र्यंबकेश्वर तालुक्याची नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली. यामध्ये विनोद पवार तालुकाध्यक्ष, दिलीप परशुराम तलवारे कार्याध्यक्ष, एकनाथ पवार उपाध्यक्ष, कृष्णा राऊत सचिव, चंदर बोरसे सहसचिव, शंकर महाले प्रसिद्धी प्रमुख आधी नेमणुका करण्यात आल्या. या बैठकीच्या वेळी गीतेश्वर खोटरे, वसंत राऊत, जयराम भुसारे, कादंबरी लेखक तुकाराम चौधरी, रामदास बोरसे, गोविंद साठे, केशव लहारे, रमेश लहारे, प्रल्हाद पवार, सुनील साबळे उपस्थित होते.

# मुंबई नाका उड्डाणपुलाखालील अनधिकृत विक्रेत्यांसह भिक्षेकऱ्यांना हटवावे

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसची मागणी; आयुक्तांना निवेदन

**नाशिक ।** नाशिक शहरातील मुंबई नाका उड्डाणपुलाखालील अवैध अनिवासी, अनधिकृत विक्रेते व भिक्षेकऱ्यांना तात्काळ हटवावे, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँगेसने केली आहे. या संदर्भात रायुकॉचे शहराध्यक्ष अंबादास खैरे यांनी महापालिका आयुक्त मनिषा खत्री यांना दिले.

नाशिक शहरातील वाहतुकीचा प्रश्न सोडविण्यासाठी शहरात भव्य असा उड्डाणपूल साकारण्यात आलेला आहे. शहराच्या सौंदर्यात वाढ होण्यासाठी उड्डाणपुलाच्या खालच्या बाजूला सुशोभिकरण करण्यात आलेले आहे. तसेच नाशिक महागरपलिकेच्या वतीने मुंबई नाका येथे क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक उभारण्यात आले आहे. या स्मारकामुळे नाशिकला वेगळी ओळख निर्माण झाली आहे. मात्र मुंबई नाका या





शहरातील अतिशय महत्वाच्या वर्दळीच्या ठिकाणी पथविक्रेत्यांनी अवैधरित्या व्यवसाय सुरू करून पथविक्रेते आणि भिकारी यांनी मुंबई नाका सर्कल परिसरातच आपला संसार थाटला आहे. नाशिक शहर हे धार्मिक व पर्यटनदृष्ट्या अतिशय महत्वाचे शहर असल्याने या शहरात देशभरातून येणाऱ्या पर्यटकांची संख्या ही खूप मोठी आहे. शहरातील मुंबई नाका सर्कल हे महत्वाचे वर्दळीची ठिकाण असल्याने या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात वाहतूक होते. अशा वेळी या पथविक्रेत्यांनी सुरू केलेला व्यवसाय,भिकारी आणि त्यांच्याकडून या ठिकाणी थाटण्यात आलेला संसार यामुळे ओंगळवाणे चित्र पर्यटकांपुढे जात आहे. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होण्यासोबतच शहराच्या सौंदर्यालाही बाधा निर्माण झाली आहे. त्यामुळे या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने पथविक्रेते आणि भिकारी यांना हटविण्यात यावे, असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी मुकेश शेवाळे, डॉ. संदीप चव्हाण, व्यंकटेश जाधव, राहुल पाठक, सार्थक घुगे, जयेश जैन आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




# प्रोटीन वाढल्याचा किडनीवर दुष्परिणाम



# आता युवतींमध्येही ‘एण्डोमेट्रिऑसिस’ची समस्या



# नको मोबाईल गेम्सचं व्यसन




# मलप्रत्यारोपण शस्त्रक्रिया का गरजेच्या?




# महिलांना जास्त झोप हवी




# ‘फबिंग’मुळे वाढतो दुरावा











# शेअर बाजार तेजीसह बंद; सेन्सेक्स 79,596 अंकांवर





**मुंबई, दि. २२ प्रतिनिधी**

मंगळवारी शेअर बाजारात खरेदीचे वातावरण होते. जागतिक बाजारपेठेत कमकुवतपणा असूनही, भारतीय बाजारपेठेत वाढ दिसून आली. व्यवहार करताना निफ्टीने २४२०० ची पातळी ओलांडली. बंद होण्याच्या बेलसह, निफ्टी ४२ अंकांच्या वाढीसह २४१६७ च्या पातळीवर बंद झाला. सेन्सेक्स १८७ अंकांनी वाढून ७९५९६ च्या पातळीवर बंद झाला.

वित्तीय क्षेत्र आणि ऑटो क्षेत्रातील मजबूत वाढ आणि एफएमसीजी समभागांमध्ये तीव्र वाढ यामुळे बेंचमार्क निर्देशांक हिरव्या रंगात बंद झाले. आयातीतील वाढ रोखण्यासाठी भारत सरकारने काही स्टील उत्पादनांवर २०० दिवसांसाठी १२ टक्के तात्पुरते सेफगार्ड ड्युटी लादण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानंतर टाटा स्टील आणि जिंदाल स्टेनलेसच्या शेअर्सना वेग आला. सुधारित तरलतेच्या परिस्थितीत रिअल्टी स्टॉकमध्ये 6% पर्यंत वाढ झाली.

देशांतर्गत मजबूत संकेतांमुळे भारतीय शेअर बाजारातील भावना सुधारल्या आणि बाजारांनी निर्देशांकांपेक्षा चांगली कामगिरी केली, त्यामुळे मिड कॅप आणि स्मॉल कॅप शेअर्समध्ये तेजी दिसून आली.

**सेन्सेक्स 79,596**

**निफ्टी 24,167**

निफ्टी ५० ०.१४% वाढीसह २४,१५८ अंकांवर बंद झाला, तर सेन्सेक्स ०.२१% वाढीसह ७९,५७६ अंकांवर बंद झाला. दरम्यान, निफ्टी मिडकॅप १०० निर्देशांक दिवसाच्या शेवटी ०.७% वाढून ५४,३५२ अंकांवर बंद झाला, तर त्याचा समकक्ष निफ्टी स्मॉलकॅप १०० निर्देशांक १६,८८३ अंकांवर बंद झाला, जो त्याच्या मागील बंदपेक्षा ०.६६% वाढून होता.

आरबीआयकडून व्याजदर कपातीची शक्यता, महागाई कमी करणे, अमेरिकेसोबत सुरू असलेल्या व्यापार चर्चा आणि परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांचा (एफपीआय) परतावा या आशावादामुळे गेल्या नऊ व्यापार सत्रांमध्ये भारतीय बेंचमार्क निर्देशांकांमध्ये ९% वाढ झाली आहे.

अमेरिका आणि चीनमधील वाढत्या तणावादरम्यान आणि अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेतील संभाव्य मंदीच्या चिंतेमुळे सुरक्षित-निवासस्थानांच्या मागणीत सतत वाढ झाल्यामुळे, स्पॉट किमतींनी प्रति ट्रॉय औंस $3,490 या नवीन विक्रमी उच्चांकावर पोहोचल्याने सोन्याचे भाव चमकत राहिले. या घटकांमुळे अमेरिकन डॉलर निर्देशांकावर तीव्र दबाव निर्माण झाला आहे, ज्यामुळे सोन्याला त्याचे जागतिक आकर्षण टिकवून ठेवण्यास मदत झाली आहे.

# सोन्याने तोडले सर्व रेकॉर्ड, लाखाच्या पार



**मुंबई, दि. २२ प्रतिनिधी**

सोन्याच्या दरात तेजी कायम आहे. किरकोळ बाजारात सोन्याने १ लाख रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. आता मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर सोन्याचा दर मंगळवारी प्रति १० ग्रॅम ९९,१७८ रुपयांच्या नव्या उच्चांकावर पोहोचला. हा दर मागील सत्रातील दरापेक्षा जवळपास १,९०० रुपयांनी अधिक आहे.

सोमवारी जीएसटी वगळता, सराफा बाजारात सोन्याचा दर प्रति १० ग्रॅम ९७,२०० रुपयांवर होता. तर ३ टक्के जीएसटीसह हा दर किरकोळ बाजारात सोन्याच्या दराने १ लाख रुपयांचा टप्पा पार केला. दरम्यान, आज एमसीएक्सवर सोन्याचा दर ०.३३ टक्के वाढून प्रति किलो ९५,५६२ रुपयांवर खुला झाला.

दिल्लीत २४ कॅरेट म्हणजे शुद्ध सोन्याचा दर १,६५० रुपयांनी वाढून प्रति १० ग्रॅम ९९,८०० रुपयांवर पोहोचला आहे. किरकोळ बाजारात सोने खरेदी करताना जीएसटीसह घडणावळ खर्च आकारला जातो. यामुळे प्रति तोळा सोन्याचा दर १ लाख रुपयांवर गेला आहे.

मुंबईत २४ कॅरेट सोन्याचा दर प्रति १० ग्रॅम १ लाख १ हजारांवर पोहोचला आहे. चेन्नई आणि बंगळूरमध्येही सोने १ लाख पार झाले आहे.

जागतिक बाजारातील अनिश्चिततेमुळे सोने आणि चांदीच्या किमतीत मोठ्या प्रमाणात अस्थिरता दिसून येत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष जेरोम पॉवेल यांच्यावर व्याजदर कपातीवरून जोरदार टीका केली आहे. या पार्श्वभूमीवर डॉलर निर्देशांक ३ वर्षांच्या नीचांकी पातळीवर घसरला. आज, यूएस डॉलर निर्देशांक ०.१६ टक्के घसरणीसह ९८.१२ च्या जवळ होता. अमेरिकन डॉलरमधील अस्थिरतेमुळे गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याकडे वळले आहे. अमेरिका-चीन व्यापार युद्धामुळेही सोन्याला सुरक्षित गुंतवणूक (सेफ हेवन) म्हणून मागणीही वाढली आहे. परिणामी सोन्याच्या दराने नवा उच्चांक गाठला आहे.

# सासू आणि सासऱ्यांनी सुनेला टोमणे मारणे क्रूरता नव्हे : सुप्रीम कोर्ट

**नवी दिल्ली, दि. २२ वृत्तसंस्था**

सासू आणि सासऱ्यांनी सुनेला टोमणे मारणे हा कौटुंबिक जीवनाचा एक भाग आहे. याला क्रूरता म्हणता येणार नाही. विशेषतः लग्नाच्या अनेक वर्षांनंतर जेव्हा दोन्हींपैकी एक बाजूने घटस्फोटाची प्रक्रिया सुरू होते, तेव्हा अशा प्रकारचे आरोप होतात. याकडे पाहताना न्यायालयाने सावधगिरी बाळगली पाहिजे, असे निरीक्षण नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. तसेच या सासू आणि सासऱ्यांवर भारतीय दंड संहिता कलम ४९८अ (पती व त्याच्या कुटुंबियांनी केलेली क्रूरता) अंतर्गत दाखल केलेली तक्रार फेटाळून लावत गुन्हेगारी कारवाई रद्द केली.



दाम्पत्याचे २००५ मध्ये लग्न झाले. पतीने मे २०१९ मध्ये घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला होता. याप्रकरणी समन्स मिळाल्यानंतर तीन दिवसांनी पत्नीने पतीसह सासू आणि सासऱ्यांवर शारीरिक आणि मानसिक छळाचा आरोप केला. या प्रकरणी पतीसह सासू आणि सासऱ्यांवर भारतीय दंड संहिता कलम ४९८अ (पती व त्याच्या कुटुंबियांनी केलेली क्रूरता) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. ही कायदेशीर कारवाई रद्द करण्यात यावी, अशी मागणी करणारी याचिका पतीने गुजरात उच्च न्यायालयात दाखल केली होती. मात्र न्यायालयाने ती फेटाळली. अखेर पतीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली.

पतीने दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती मनमोहन आणि मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. खंडपीठाने स्पष्ट केले की, सासू आणि सासऱ्यांनी सुनेला टोमणे मारणे हा कौटुंबिक जीवनाचा एक भाग आहे. याला क्रूरता म्हणता येणार नाही. विशेषतः वैवाहिक वादांशी संबंधित प्रकरणांमध्ये, विशेषतः लग्नाच्या अनेक वर्षांनंतर जेव्हा एक पक्ष दुसऱ्या पक्षाविरुद्ध घटस्फोटाची प्रक्रिया सुरू करतो तेव्हा आरोप केले जातात. जिथे द्वेषाचे आरोप आहेत, तिथे संबंधित न्यायालयाने आरोपांमागील हेतू काय आहे? याची चौकशी करावी, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

**सासू आणि सासऱ्यांवर खटला चालवण्याची परवानगी देणे ठरेल प्रक्रियेचा गैरवापर**

सर्वोच्च न्यायालयाने असे आढळून आले की, गुजरात उच्च न्यायालयाने या प्रकरणातील व्यापक परिस्थितीचा विचार केला नाही. सासरचे लोक टोमणे मारणे आणि घरखर्चासाठी पैसे न देणे हे फक्त आरोप आहेत. काही ठिकाणी सासू आणि सासऱ्यांनी सुनेला टोमणे मारणे हे दैनंदिन जीवनाचा एक भाग आहेत. अशा टोमण्यांकडे सहसा कुटुंबाच्या आनंदासाठी दुर्लक्षित केले जातात. तक्रारदाराच्या स्वतःच्या पालकांनी आणि काकांनी सूनेला कुटुंबाच्या कल्याणासाठी संयम बाळगण्याचा सल्ला दिला होता. अशा परिस्थितीत, सासू आणि सासऱ्यांवर खटला चालवण्याची परवानगी देणे हे प्रक्रियेचा गैरवापर ठरेल, असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने सासरच्या लोकांविरोधातील करण्यात आलेली कायदेशीर कारवाई रद्द करण्याचे आदेश दिले. तसेच पतीविरोधातील खटला कायद्यानुसार पुढे चालू राहील, असे स्पष्ट केले.

# श्री छत्रपती साखर कारखाना निवडणूक

## पवार, भरणे गुरुवारी घेणार इच्छुकांच्या मुलाखती

**बारामती, दि. २२ प्रतिनिधी**

श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्यासाठी श्री जय भवानीमाता पॅनेलकडून इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती गुरुवारी बारामतीत संघवीनगर येथील इम्पिरियल बँक्वेट हॉल येथे पार पडणार आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार व क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे हे मुलाखती घेतील, अशी माहिती पृथ्वीराज जाचक व किरण गुजर यांनी दिली.

हा मुलाखतीचा कार्यक्रम सर्वपक्षीय उमेदवारांसाठी आहे. सकाळी ९ ते १० या वेळेत गट क्रमांक ६ गुणवडी, सकाळी १० ते ११ या वेळेत गट क्रमांक ५ सोनगाव, सकाळी ११ ते १२ या वेळेत गट क्रमांक १ लासुर्णे, दुपारी १२ ते १ गट क्रमांक २ सणसर, दुपारी २ ते ३ गट क्रमांक ३ उद्धट व दुपारी ३ ते ४ गट क्रमांक ४ अंथुर्णे अशा गटनिहाय मुलाखती पार पडतील. इच्छुकांनी या मुलाखतींसाठी दिलेल्या वेळेत उपस्थित राहवे, असे आवाहन गुजर यांनी केले आहे.

# "तो मुलीला ड्रग्ज द्यायचा..."

## पोलीस अधिकाऱ्याची हत्या करणाऱ्या पत्नीचा मोठा खुलासा

**बंगळूरू, दि. २२ वृत्तसंस्था**

कर्नाटकचे माजी पोलीस महासंचालक ओम प्रकाश यांचा रविवारी बंगळुरूमधील एचएसआर लेआउट येथील त्यांच्या निवासस्थानी मृत्यू झाला होता. ६८ वर्षीय ओम प्रकाश यांचा मृतदेह त्यांच्या तीन मजली घराच्या तळमजल्यावर रक्ताने माखलेला आढळला होता. त्यांच्या शरीरावर जखमांच्या खुणा होत्या, पोलिसांनी याप्रकरणी त्यांची पत्नी पल्लवी हिला अटक केली आहे. पल्लवीने जेवणाच्या ताटावरच ओम प्रकाश यांचा चाकूने भोकसून खून केला आणि त्यानंतर पोलिसांना याची माहिती दिली. त्यानंतर आता पल्लवीने ओम प्रकाश यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.

पल्लवीने आधी ओम प्रकाश यांच्यावर मिरची पावडर फेकली. जेव्हा ते जीव वाचवण्यासाठी इकडे तिकडे धावत होते तेव्हा पल्लवीने त्यांच्या मानेवर, पोटावर आणि छातीवर १०-१२ वेळा चाकूने वार केले. पोलिसांच्या वृत्तानुसार, पल्लवीने गुन्हा कबूल केला आहे. या घटनेच्या वेळी मुलगी कृती देखील तिथे उपस्थित होती. हत्येनंतर पल्लवीने दुसऱ्या आयपीएस अधिकाऱ्याच्या पत्नीला राक्षसाला ठार केले असा मेसेज पाठवला. त्यानंतर पल्लवीने त्यांना फोन करून सांगितले की तिने ओम प्रकाशचा खून केला आहे.

त्यानंतर आता पल्लवीने ओम प्रकाश यांच्याबाबत अनेक दावे केले आहेत. ओम प्रकाश त्याच्या मुलीला ड्रग्ज देत होते. तसेच, त्याच्या जेवणात सॅनिटायझर मिसळल्याचा आरोपही करण्यात आला आहे. टाइम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार, अटक झाल्यानंतर पल्लवीने आरोप केला आहे की ओम प्रकाश कृतीला ड्रग्ज देत होता. "त्याने आता मुलीला ड्रग्ज देण्यास सुरुवात केली होती जी तिच्या मेंदूवर परिणाम करत होते. हे फक्त त्याने त्याच्याविरोधात आवाज उठवायला सुरुवात केली म्हणून केले. माझी मुलगी दररोज मरत आहे. ती अतिशय धोकादायक परिस्थितीत आहे आणि तिला लगेच मदतीची गरज आहे. मुलीचा फोन, लॅपटॉप आणि सर्व हॅक केली आहेत. माझ्याकडे पुराव्यांची कमी नाही," असे पल्लवीने म्हटलं.

"ओम प्रकाशने मालमत्तेसाठी हे सर्व केले होते. माझा नवरा इतरांना मानसिकदृष्ट्या अस्थिर घोषित करून त्याचे काम करत होता. ही सर्व कामे मालमत्तेच्या वादातून झाले. माझा नवरा माझ्या मुलाची आणि सुनेची बाजू घेतो. मी त्याला वर्षानुवर्षे वेगळे होण्यास सांगत आहे, पण काहीही होत नाहीये. मी जिथे जिथे एकटी जाते तिथे तो माझ्या खाण्यापिण्यात विष मिसळायला सुरुवात करतो. विष देण्यासाठी घरातील कर्मचाऱ्यांनाही लाच दिली होती. माझी मुलगी खूप त्रास सहन करत आहे. मी शांत बसू शकत नाही," असे पल्लवीने एका मेसेजमध्ये म्हटलं होतं.

दरम्यान, ओम प्रकाश यांचा मुलगा कार्तिकेय याच्या तक्रारीनंतर, त्यांची पत्नी पल्लवी आणि मुलगी कृती यांच्याविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. "आई पल्लवी गेल्या एका आठवड्यापासून वडिलांना जीवे मारण्याची धमकी देत होती. या धमक्यांमुळे माझे वडील त्यांच्या बहिणीच्या घरी राहायला गेले होते. दोन दिवसांपूर्वी माझी धाकटी बहीण कृती तिथे गेली आणि तिने माझ्या वडिलांना घरी परतण्यासाठी दबाव आणला. तिने त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध परत आणले," असे मुलाने आपल्या तक्रारीत म्हटले.

# काश्मीर ते कन्याकुमारी अंतर 12 दिवसात पार करणारे डॉ.महेंद्र महाजन



सायकलचा प्रवास हा सर्वानाच आवडतो. एक तर मुक्त सैर करता येते आणि शरीराचा व्यायाम देखील होतो.परंतु हीच सायकलस्वारी एखाद्या अवलियाने एखाद्या विक्रमासाठी करायची ठरवली तर? नक्कीच तो विक्रम बनणार. नाशिककर डॉ.महेंद्र महाजन या सायकलिस्ट ने काही महिन्यापूर्वी काश्मीर ते कन्याकुमारी हे ४ हजार किलोमीटरचे अंतर केवळ १२ दिवसात पूर्ण करून विश्विक्रमच केला आहे. वेगवान सायकलिंगचा विक्रम करणाऱ्या या मोहिमेला 'के टू सायकलिंग चॅलेंज 'असे नाव देण्यात आले होते. या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड यूएमसीए रेकॉर्ड्समध्ये घेतली गेली आहे. या मोहिमेत 'खेळों इंडिया 'आणि तंबाखू बंद' या उपक्रमांचे समर्थन करण्यात आले. केवळ अभ्यास करूनच करिअर बनवता येते हा समज काढून पालकांनी आपल्या पाल्याना खेळामध्ये करिअर करण्यासाठी प्रोत्साहित करावे असा संदेश या मोहिमेद्वारे देण्यात आला. तर केवळ आरोग्यविषयक जागरूक लोकच मजबूत राष्ट्र निर्माण करू शकतात,या उक्तीप्रमाणे तंबाखू बंद या अभियानाला समर्थन करण्यासाठी या मोहिमेचा वापर केला गेला. २ नोव्हेंबर रोजी लाल चौक श्रीनगर येथून हि मोहीम सुरु झाली होती. पुढे श्रीनगर, उधमपू, पठाणकोट , दाशुआ, होशियारपूर, अंबाला, दिल्ली, बायपास, आग्रा, ग्वाह्लेर, झाशी,सागर, छिंदवाडा, नागपूर, अनंतपूर, बंगळुरू, मदुराई, तिरुनेलवेली मार्गे कन्याकुमारी समुद्रकिनारा येथे [स्वामी विवेकानंद स्मारक] मोहिमेचा समारोप झाला. या वेगवान सायकल प्रवासात महाजन यांनी भारताच्या जम्मू-काश्मीर, पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तामिळनाडू या १२ राज्यातून प्रवास केला. याच मोहिमेदरम्यान झेलम, चेनाब, तावी, बीस, सतलज, कृष्ण, कावेरी, या नद्या महाजन यांनी पार केल्या आणि हिमालय,विंध्याचल,चंबळ,सातपुडा या महत्वाच्या भारतीय पर्वत रांगांतून हा रोमहर्षक वेगवान सायकल प्रवास घडला आहे. रोज ३५० ते ४०० किलोमीटरचा सायकल प्रवास महाजन यांनी या मोहिमेत केला आहे.या मोहिमेसाठी जिममध्ये जाऊन महाजन यांनी पाठीचे विशेष व्यायाम देखील शिकले होते. या व्यायामासाठी त्यांना प्रशिक्षक मातें ठक्कर यांचे मार्गदर्शन लाभले. या मोहिमेत महाजन यांच्या सोबत कबीर रघुरे, किशोर काळे,राहुल ओढेकर,दत्त चकोर, हे सदस्य कृमेम्बर्स म्हणून सहभागी झाले होते.एकूणच डॉ.महेंद्र महाजन यांची हि काश्मीर ते कन्याकुमारी सायकलवारी समाजाच्या दृष्टिकोनातून एक आदर्शव्रत अशीच सायकलस्वारी होती ज्या मोहिमेचा उद्देश हा समाजाला चांगलं काहीतरी शिकविण्याचा होता.

**मुलखावेगळी माणसं**

**लोकमानस**

# पाच दिवसांत व्हिडीओ काढून टाका

## दिल्ली उच्च न्यायालयाचा रामदेव बाबांना दणका

**नवी दिल्ली, दि. २२ वृत्तसंस्था**

रुह अफजाला 'शरबत जिहाद' म्हटल्याबद्दल दिल्ली उच्च न्यायालयाने मंगळवारी बाबा रामदेव यांना फटकारले. बाबा रामदेव यांचे विधान अक्षम्य आहे आणि त्याचे समर्थन केले जाऊ शकत नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. हे विधान कोणत्याही प्रकारे समर्थनीय ठरू शकत नाही. १२ वाजता न्यायालयात पुन्हा सुनावणी झाली. बाबा रामदेव यांच्या वकीलांनी न्यायालयाला सांगितले की, आम्ही व्हिडिओ काढून टाकत आहोत.



यावर उच्च न्यायालयाने म्हटले की, ज्यावेळी मी व्हिडीओ पाहिला तेव्हा मला माझ्या कानांवर आणि डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. बाबा रामदेव यांच्या वकिलाने सांगितले की, आम्ही आधीच व्हिडीओ काढून टाकण्यास सांगितले आहे. यावर न्यायालयाने म्हटले की, शपथपत्र दाखल करा. बाबा रामदेव यांच्या विधानाविरुद्ध हमदर्दने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. मंगळवारी दिल्ली उच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली. बाबा रामदेव यांच्या विधानावर न्यायालयाने तीव्र आक्षेप घेतला.

रामदेव बाबा यांच्या वकिलांनी सांगितले की, कृपया निष्पक्षतेचा फायदा घेऊ नका. हमदर्दच्या वकिलाने सांगितले की, ते विधान काढून टाकले पाहिजे. आम्ही खटला दाखल केल्यापासून, काहीतरी वेगळेच समोर आले आहे. रामदेव यांच्या वकिलाने सांगितले की, ते आम्हाला देऊ शकतात. ही दुसऱ्या प्लॅटफॉर्मची गोष्ट आहे. माझ्या नियंत्रणात जे काही आहे ते काढून टाकले जाईल. छापील किंवा व्हिडिओमधील सर्व वादग्रस्त जाहिराती काढून टाकल्या जातील किंवा योग्य त्या बदलल्या जातील.

या सुनावणीवेळी न्यायालयाने म्हटले की, ते प्रतिज्ञापत्रावर आले पाहिजे. भविष्यात तो असे कोणतेही विधान, जाहिरात किंवा सोशल मीडिया पोस्ट प्रसिद्ध करणार नाही असे प्रतिज्ञापत्र दाखल करावे. प्रतिज्ञापत्रात काय म्हटले पाहिजे यावर वकिलांमध्ये वादविवाद झाला.

न्यायालयाने म्हटले, हे सर्व समाविष्ट असलेले प्रतिज्ञापत्र दाखल करा, आपण पाहू. आम्हाला अशी प्रकरणे उघडकीस येऊ नयेत असे वाटते. न्यायालयाने म्हटले की, ५ दिवसांच्या आत प्रतिज्ञापत्र दाखल करावे. हा खटला १ मे रोजी सूचीबद्ध आहे.

# हिंदू-मुस्लिमांसाठी वेगवेगळे मतदान केंद्र बनवा - शुभेंदु अधिकारी

**कोलकाता, दि. २२ वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालमध्ये अलीकडेच वक्फ सुधारणा विधेयकावरुन मोठा हिंसाचार झाला. पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीला एकवर्षापेक्षा कमी कालावधी उरला आहे. पश्चिम बंगालमधील भारतीय जनता पार्टीने सोमवारी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे हिंदूसाठी वेगळा पोलिंग बूथ स्थापन करण्याची मागणी केली. भाजप नेत्याने पश्चिम बंगालमध्ये हिंदू-मुस्लिमांसाठी वेगवेगळं मतदान केंद्र उभारण्याची मागणी केली आहे.

भाजप नेते शुभेंदु अधिकारी यांनी निवडणूक आयोगाकडे हिंदूसाठी वेगळं मतदान केंद्र बनवण्याची मागणी केली. भाजप नेत्याने हिंदू आणि मुस्लिमांसाठी वेगवेगळ पोलिंग बूथ उभारण्याची मागणी केली. जिथे 50 टक्क्यापेक्षा कमी हिंदू मतदार आहे, हिंदू वस्तीसाठी आणि हिंदू मतदारासाठी वेगळा पोलिंग बूथ बनवा. हिंदू मतदार मुस्लिम वस्तीतून गेल्यास त्यांच्यावर हल्ला होऊ शकतो. त्यांना मतदानापासून रोखलं जाऊ शकतं, असं भाजप नेत्याच म्हणणं आहे.

# चीनला धक्का, स्टील उत्पादनांच्या आयातीवर 12 टक्के आयातशुल्क लादण्याचा भारताचा निर्णय

**नवी दिल्ली, दि. २२ वृत्तसंस्था**

अमेरिकेने चीनवर २४५ टक्के आयात शुल्क लादलं होतं, तर चीननेही जोरदार प्रत्युत्तर दिलं होतं. मात्र, त्यानंतर अमेरिका आणि चीन यांच्यातील 'टॅरिफ वॉर' नुकतंच शांत होईल अशी परिस्थिती असतानाच आता भारताने चीनला मोठा धक्का दिला आहे. चीनमधून आयात केल्या जाणाऱ्या स्टीलवर १२ टक्के आयातशुल्क लादण्याचा निर्णय भारताने घेतला आहे. या संदर्भातील वृत्त रॉयटर्स या वृत्तसंस्थने दिलं आहे. वृत्तानुसार, भारताने स्टील आयातीवर १२ टक्के तात्पुरता आयात कर लादण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, चीनमधून कमी किमतीवर स्टील आयात वाढू नये, त्या अनुषंगाने हा १२ टक्के आयातशुल्क लादण्याचा निर्णय घेतल्याचं सांगितलं जात आहे.

# मॅटर एरा नम्मा बेंगळुरूमध्ये लाँच



भारतातील अग्रगण्य टेक इनोव्हेशन कंपनी मॅटर ने भारताच्या इनोव्हेशन कॅपिटल, बेंगळुरूच्या मध्यभागी त्यांची प्रमुख इलेक्ट्रिक मोटरसायकल – एरा अधिकृतपणे लाँच केली आहे. हे MATTER च्या जागतिक दर्जाच्या मॅन्युफॅक्चरिंग हबच्या यशस्वी उद्घाटनानंतर आहे आणि संपूर्ण भारतात त्याच्या वचनबद्ध बाजारपेठ विस्तार आणि गतिशीलता परिवर्तनाची सुरुवात आहे. मॅटर एरा आता ₹१.८८ लाखांपासून सुरू होणाऱ्या पूर्व-नोंदणी शोरूम किमतीत उपलब्ध आहे. मर्यादित काळासाठी लाँच ऑफर म्हणून, बेंगळुरूमधील पहिल्या ५०० रायडर्सना ₹१.७९ लाखांपासून सुरू होणाऱ्या विशेष किमतीत एरा घेता येईल, ज्यामध्ये ₹१५,००० किमतीची मोफत आजीवन बॅटरी वॉरंटी मिळेल - मॅटरचा ब्रँडला त्याच्या सुरुवातीच्या विश्वासूंसाठी धाडसी होकार.ब्रँडला लोकांच्या जवळ आणण्यासाठी, मॅटर लवकरच BTM लेआउटमध्ये पहिला एक्सपिरीयन्स हब - वैश्य बँक कॉलनीजवळील दुसरा टप्पा, १०० फूट रोड येथे अनावरण करणार आहे. या उत्साही जागेमुळे रायडर्सना एरा प्रत्यक्ष अनुभवता येईल, टेस्ट राईड्स घेता येतील आणि मॅटरचे तत्वज्ञान प्रत्यक्ष अनुभवता येईल.

"या प्रवासाचे नेतृत्व करण्यासाठी बेंगळुरूपेक्षा चांगले शहर दुसरे नाही - जिथे नावीन्य ही केवळ एक कल्पना नाही, ती एक जीवनशैली आहे. येथील प्रत्येक लेन, प्रत्येक रायडर उद्देश आणि प्रगतीचा मंत्र जपतो. एरा ही फक्त एक बाईक नाही - ती २२ व्या शतकातील मोटारसायकल आहे. ती रॉकेटचा थरार आणि तुमच्या खिशात आवडणारी व्यावहारिकता देते.''असे मॅटरचे संस्थापक आणि ग्रुप सीईओ मोहल लालभाई यांनी यावेळी सांगितले.

**चलती का नाम गाडी**

# महिला मृत्यू प्रकरणी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर कारवाई व्हावी का?

**वाद संवाद**

**१] डॉ. सुधीर पाटणकर**
**[ सहायक अधिवक्ता डी. वाय . पाटील रुग्णालय ]**

पुण्याच्या दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलने उपचारार्थ आलेल्या एका गरोदर स्त्रीला पैशाअभावी उपचार नाकारले आणि तिचा मृत्यू झाला हि अत्यंत दुर्दैवी आणि तितकीच डॉकटरकीच्या पेशाला काळिमा फासणारी अशी घटना आहे. सर्वसामान्य रुग्णाला १० लाख रुपये अनामत रक्कम म्हणून भरणे केवळ अशक्यप्राय बाब आहे. परंतु अशा वेळी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या विश्वस्तांनी माणुसकी दाखवून त्या महिलेवर किमान खर्चात उपचार करायला हवे होते असे वाटते. त्यामुळे त्या महिलेला आणि तिच्या बाळाला दोघांना वाचवता आले असते. परंतु या रुग्णालयाने आपण केवळ श्रीमंतांच्या सेवेसाठी तत्पर आहोत गोरगरिबांना इथे उपचार मिळणार नाहीत हेच दर्शवून दिले. म्हणूनच दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर सरकारने कडक कारवाई करून या रुग्णालयाचा परवानाच रद्द करायला हवा.

**२] मीनल साने**
**[समाजसेविका ]**


दीनानाथ मंगेशकर रुग्णालया सारखी धर्मादाय रुग्णालय हि सरकारकडून अनेक सवलती मिळवतात परंतु प्रत्यक्षात त्याचा लाभ मात्र गोरगरीब रुग्णांना मिळत नाही. या रुग्णालयाचा उद्देश हा केवळ व्यावसायिक हेतूने रुग्णाकडून भरमसाठ पैसे लुटणे हाच असावा असे यांचे वागणे आहे. या रुग्णालयाने केवळ पैशासाठी एका गरीब महिलेचा जीव घेतला हे अत्यंत घृणास्पद आणि तितकेच निंदनीय आहे. या रुग्णालयाला सरकारने कडक कारवाई अंतर्गत दंड करायला हवाच शिवाय मृत पावलेल्या महिलेच्या कुटुंबियांना देखील या रुग्णालयामार्फत भरपूर दंड आकारून मदत केली जावी असे वाटते. आश्चर्याची बाब म्हणजे या प्रकरणाला आता एक महिना झाला तरी या रुग्णालयाचे विश्वस्त मंगेशकर कुटुंबीय काहीही बोलायला तयार नाहीत हे आणखी लज्जास्पद आणि निषेधार्ह आहे.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# सनी देओलच्या 'जाट' चित्रपटाची 100 कोटींच्या क्लबमध्ये एन्ट्री

**मुंबई, दि. २२ प्रतिनिधी**

'जाट' या ॲक्शन-ड्रामा चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जोरदार कामगिरी करत १०० कोटींचा टप्पा पार केला आहे. प्रेक्षकांच्या भरघोस प्रतिसादानंतर हा चित्रपट यशस्वी ठरला आहे. १२ व्या दिवशी त्याच्या कमाईत थोडी घट झालेली पाहायला मिळाली. सोमवारी केवळ ४.७५ कोटींचीच कमाई झालीय. दरम्यान, अक्षय कुमार आणि आर माधवन यांचा 'केसरी चॅप्टर २' साठी फर्स्ट मंडे टेस्ट अडचणीत ठरलं आहे. कारण, रविवारी १२ कोटी कमावणारा हा चित्रपट चौथ्या दिवशी केवळ ४.५० कोटींचे नेट कलेक्शन करू शकला. सलमान खानचा 'सिकंदर' चित्रपट म्हणावा तसा चालत नाही.




'जाट'ने पहिल्या आठवड्यात जबरदस्त गल्ला जमवला होता. विकेंडला अधिक कमाई केल्यानंतर दुसऱ्या आठवड्यातही काही प्रमाणात कमाई चांगली झाली. मात्र, सोमवारची आकडेवारी पाहता, त्याची गती थोडी मंदावली आहे. तरीही, १०० कोटींवर पोहोचणारा हा एप्रिलमधील पहिला मोठा ब्लॉकबस्टर ठरला आहे.

दुसरीकडे, 'सिकंदर' चित्रपटाला मात्र अजूनही बॉक्स ऑफिसवर म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाहीये. पहिल्या काही दिवसांतच निराशाजनक सुरुवात झालेल्या चित्रपटाची कमाई केवळ १.२ कोटींच्या आसपासच राहिली.

# अक्षय कुमारने लोअर परळमधील जागा विकली, 65% टक्के नफा कमावला

**मुंबई, दि. २२ प्रतिनिधी**

सुपरस्टार अभिनेता अक्षय कुमारने त्याची लोअर परळमधील जागा विकली आहे. या व्यवहारात अक्कीने घसघशीत फायदा मिळवला आहे. कारण २०२० मध्ये त्याने ही प्रॉपर्टी ४.६५कोटींना विकत घेतली होती. तर आता त्याने ती ८ कोटी या बाजारभावाला विकली आहे. या व्यवहारात त्याला जवळपास ६५% टक्के नफा झाला आहे.



या व्यवहारासाठी तब्बल ४८ लाख रुपये मुद्रांक शुल्क आणि ३०,००० रुपये नोंदणी शुल्क भरले गेले. अक्षयने जागेचा व्यवहार केलेला एरिया म्हणजे लोअर परळ हा एरिया हाय प्रोफाइल व्यावसायिक आणि निवासी मालमत्तांसाठी ओळखला जातो. बांद्रा- कुर्ला कॉम्प्लेक्स आणि नरीमन पॉइंटसारख्या भागांशी असलेली कनेक्टीव्हीटी हे या प्रॉपर्टीचे खास वैशिष्ट्य आहे. याच परिसरात अभिषेक बच्चन, शाहिद कपूर, अमीश त्रिपाठी आणि मनोज वाजपेयी यांच्याही मालमत्ता आहेत.

वैशिष्ट्य म्हणजे अक्षय कुमारने गेल्या काही महिन्यात 100 कोटींहून अधिक मालमत्ता किमतीच्या विकल्या आहेत. यामध्ये बोरीवली भागातील ओबेरॉय स्काय सिटी येथे असलेल्या १५ कोटी रुपयांहून अधिक किंमतीच्या तीन अपार्टमेंट्सचा समावेश आहे.

सुपरफिट अक्षय कुमार आता आगामी सिनेमांमुळे चर्चेत आहे. सध्या अक्षय कुमार केसरी 2 मुळे चर्चेत आहे. केसरी या एतिहासिक सिनेमाने त्याला यशाची चव चाखायला मिळाली होती. आता केसरी 2 मध्ये हटके कोर्टरूम ड्रामा पाहायला मिळतो आहे. 'द केस दॅट शुक द एम्पायर : वन मॅन्स फाईट फॉर द ट्रुथ' या पुस्तकावर हा सिनेमा बेतला आहे.

याशिवाय केसरी 2 नंतर पुनः अक्षय वकिलांच्या कोटमध्ये दिसणार आहे ते जॉली एल एल बी 3 मध्ये. याशिवाय अक्षय सह मल्टीस्टरर हाऊसफूल फ्रँचाईजीचा 5 वा सिनेमाही रिलीज होण्यासाठी सज्ज आहे.

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com